# चैतन्य लहरी

जुलै - ऑगस्ट २००७

अंक क्र. ७/८



# श्रीकृष्ण पूजा २००७













# अनुक्रमणिका


- श्रीमाताजींची डॅग्लीओस भेट (वृत्तांत), दिनांक ७ जुलै २००७ ........ २
- श्री आदिशक्ती पूजा, कबेला, दिनांक २४,जून २००७ ........ ३
- जागतिक सहजयोग संघटनेचा स्थापना दिवस प्रथम वार्षिक समारंभ ,रविवार दि.८ जुलै २००७ , इटली. ........ ८
- श्रीमाताजींची डॉक्टर्स व परिचारिकांसमवेतची एक भेट, बुधवार दि. ११ जुलै २००७,इटली ........ ८
- युवाशक्ती सेमिनार, कबेला २००७ साठी युवाशक्तीने श्रीमाताजींना दिलेले प्रार्थनीय निमंत्रण, ३१ जुलै २००७ ........ ९
- आदिशक्ती पूजेपूर्वी श्रीमाताजी बास्केटचा स्वीकार करताना ,२८ जून २००७ ........ १०
- हॉटेल पिझेरीया मध्ये श्रीमाताजींचे आगमन,२१ जुलै २००७ ........ १०
- श्रीमाताजींच्या सहवासात डॉक्टरांची सभा,२५ मार्च १९९३ (सारांश) ........ ११
- सार्थ कुंञ्जिकास्तोत्र ........ १६
- श्रीमाताजींचे पूजाप्रसंगीचे प्रवचन, ३१ डिसेंबर ९८ (संक्षिप्त) ........ १८


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, ''**निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००७ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
kOTHRUD, PUNE 411 O38. TEL. 020 25286537

# श्रीमाताजींची डॅग्लीओस भेट

## रविवार दिनांक ७ जुलै २००७

डॅग्लीओसाठी आणि या स्वर्गीय ठिकाणावर प्रेम करणाऱ्या लोकांसाठी हा दिवस ऐतिहासिक होता. श्रीमाताजींनी आपल्या दैवी आगमनामुळे त्यांच्या त्या डॅग्लीओमधील घराला पुन्हा एकदा आशीर्वादीत केले होते. त्या ठिकाणी शाळा सुरू होऊ शकते का हे पहाण्यासाठी सर सी.पी.श्रीवास्तव साहेबांसोबत सायंकाळी ७.०० च्या सुमारास त्यांचे आगमन झाले.भोजनाच्या आवारासमोर श्रीमाताजींची कार थांबली आणि त्यांनी सर्वत्र पहाणी करण्यास सुरवात केली.त्यानंतर त्या घराबाहेर आल्या आणि त्यांनी ध्यानाची खोली पाहिली. त्या खोलीच्या व्हरांड्यावरील बाजूच्या भिंतीवर सहजयोगी मुलांनी काढलेली चित्रे त्यांनी पाहिली. त्यानंतर श्रीमाताजींनी सर्व खोल्या पाहण्याची इच्छा केली.

श्रीमाताजींनी गच्चीवर जाण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्यांनी गच्चीवरून समोरील सुंदर डोंगर दऱ्या पाहत तेथे अर्धा तासापेक्षाही अधिक वेळ बसणे पसंत केले. त्यांनी तिथे बरेच सखोल प्रश्न विचारले.जसे की, मुले कोठे खेळणार, हे ठिकाण सुरक्षित आहे का? इथे दुसरा एखादा रस्ता आहे का? इथे पाणी आहे का? (पाण्याची सोय) हे पाणी कुठून येते? बाजूच्या गावाचे नाव काय? त्या गावाच्या नावाचा अर्थ काय?ते गाव या ठिकाणापासून किती दूर आहे? तिथे किती लोकवस्ती आहे ? नदी कोठे आहे? त्याचप्रमाणे इथे एखादा साप आहे काय? या गोष्टीची श्रीमाताजी चौकशी करीत होत्या.त्यानंतर आम्ही श्रीमाताजींना सांगितले की, मुलांचे आगमन झाल्याबरोबर सर्व साप पळून गेले, त्यांच्या प्रश्नांची अशाप्रकारे उत्तरे देण्याचा आम्ही प्रयत्न केला आणि आम्ही त्या ठिकाणी (डॅग्लीओ) येथे दरवर्षी भरणाऱ्या उन्हाळी शिबिराच्या कार्यक्रमाबाबतची माहिती सांगितली त्यामध्ये या शिबिरामध्ये किती ते किती वयोगटामधील मुले सहभागी होतात त्यावेळी मुले कशाप्रकारे गिर्यारोहण, नौकाविहार करतात या सर्वांबाबतची माहिती आम्ही श्रीमाताजींना सांगितली. श्रीमाताजींनी उन्हाळी शिबिराच्या ठिकाणाजवळील पुढची जागा मुलांच्या बागेसाठी विकत घेण्यास सांगितले. यावेळी श्रीमाताजींनी सुचविलेल्या जमिनीचा तुकडा पूर्वीपासूनच आपल्या मालकी चा असल्याची माहिती त्यांना देण्यात आली.

प्रश्न आणि उत्तरादरम्यान तिथे एक विशिष्ट प्रकारची पूर्ण शांतता होती की जी एखादी व्यक्ती फक्त डेग्लीओ मध्येच अनुभवू शकते. त्याचबरोबर त्या वातावरणामध्ये अतिशय सुंदर वेगळे असे चैतन्य जाणवत होते. त्यावेळी श्रीमाताजींनी बरीचशी माहिती हिंदीमध्ये सांगितली. तिथे उपस्थित असलेल्यां मधील श्री जयेंद फ्लीट ही अशी व्यक्ती होती की ज्यांनी लहानपणी या उन्हाळी शिबिरात सहभाग घेतला होता आणि आता तेच 'जयेद्र फ्लीट' एक तरुण व्यक्ती झाले आहेत. श्रीमाताजींनी त्यांच्याकडे पाहून स्मितहास्य केले. पुन्हा एकदा श्रीमाताजी डॅग्लीओबद्दल, 'प्रचंड चैतन्यलहरी' असे म्हणाल्या.

त्यानंतर कार पाठीमागच्या व्हरांड्यामध्ये श्रीमाताजी पुन्हा एकदा थांबल्या. तिथे व्हरांड्यामध्ये लावलेली चित्रे श्रीमाताजी लक्षपूर्वक पहात होत्या. त्यावेळी श्रीमाताजी अतिशय आश्चर्यचकित झाल्या. जेव्हा त्यांनी दुर्गा देवीचे अतिशय सुंदर चित्र पाहिले तेव्हा त्या चित्राचे त्यांनी कौतुक केले आणि त्या म्हणाल्या हे चित्र काढणारा मुलगा मोठा होता. वास्तविक ते चित्र स्टीव्हन काकांनी काढले होते. त्यानंतर श्रीमाताजींनी स्वयंपाकाच्या खोलीमध्ये जाण्याची इंच्छा व्यक्त केली. कारण त्यांनी आपण भोजन कोठे बनवितो याबद्दल चौकशी केली होती. आम्ही श्रीमाताजींना सर्व काही सांगितले.जेव्हा श्रीमाताजी कारमध्ये बसल्या त्यावेळी त्याठिकाणी एक मोठे झाड वाढत असलेले त्यांनी पाहिले की जिथे आम्ही नेहमी जेवणाची भांडी धुतो. त्यावेळी श्रीमाताजी म्हणाल्या की, 'हे झाड चांगले नाही कारण या झाडाच्या फांद्यामध्ये विष असते. त्यामुळे हे झाड काढून टाका.' श्रीमाताजी तेथून गेल्यानंतर आम्ही ते झाड काढून टाकले.आम्हा सर्वांना त्या नंदनवनामध्ये पुन्हा एकदा आशीर्वादीत करून डोंगराच्या खालच्या मार्गाने सूर्यास्ताच्या किरणांमधून आपल्या महालाच्या दिशेने श्रीमाताजींनी प्रस्थान केले. डॅग्लीओवर प्रेम करणाऱ्या सहजयोग्यांचे श्रीमाताजींच्या चरणाने पवित्र होण्याचे हे स्वप्न अशाप्रकारे अस्तित्वात आले.

– जय श्रीमाताजी

• • •

## श्री आदिशक्ती पूजा २००७

कबेला, दिनांक २४,जून २००७



सहजयोग्यांनी प्रेमशक्तीचे महत्त्व जाणलेले आहे. ते दुर्मीळ आणि अद्‌भूत आहेत. ते प्रेमशक्तीचा आदर करत असल्यामुळे चांगले कार्य करू शकतात. तुम्ही इतरांवरही प्रेम करताना दिसून आले पाहिजे. कारण हे पाहून इतरांना तशी प्रेरणा मिळणार आहे.

तुम्ही सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याचा प्रयत्न करा. जर तुम्ही खरेखुरे सहजयोगी असाल तर तुम्ही कुणाचाही द्वेष न करता, तुम्ही स्वत:इतकेच इतरांवरही प्रेम कराल.

तुम्हाला सर्वांना येथे पाहून फार आनंद झाला.मला वाटतं की आज या ठिकाणी होत असलेली ही पहिलीच पूजा आहे. तुम्हा सर्वांची व्यवस्थाही चांगल्याप्रकारे केली आहे. येथे येणे तुम्हालाही सोईचे झाले असेल.

आजचा दिवस हा खरोखर महत्त्वाचा दिवस आहे.आज आदिशक्ती पूजा साजरी करावयाची आहे. या आदिशक्तीची उत्पत्ती, मूळ उगम या विषयावर मी कधीच विवेचन केलेले नाही.

मी आज तुम्हाला प्रथमच सांगत आहे की आदिशक्ती ही कालारंभापासूनच अस्तित्वात असलेली परमोच्च अशी जगज्जननी आहे.

जिला स्वत:लाच हे जगत् निर्माण करावयाचे होते तीच ही परमात्म्याची शक्ती होय! तिने स्वत:नेच या विश्वाची निर्मिती केली. म्हणून मी तुम्हाला आज अतिप्राचीन अशा या विषयाबद्दल सांगणार आहे.

आदिशक्ती म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराची शक्ती होय! आणि तिनेच परमेश्वराचे साम्राज्य या पृथ्वीतलावर साकार करण्यासाठीच या विश्वाची निर्मिती केली. तुमच्या देखील ही गोष्ट सहज लक्षात आली असेल की, या पृथ्वीतलावर केवळ अंधाराखेरीज काहीही नव्हते. आणि या शून्यातूनच आदिशक्तीला विविध रंगानी नटलेला निसर्ग,वनश्री,सौंदर्य,अशी एकूणच सृष्टीची रचना करावी लागली. पण या सर्व मूक गोष्टी आहेत. त्यामध्ये प्रकटीकरण काहीच नाही.

अर्थात, काही झाडे व फुले फारच सुंदर आहेत. त्यांच्यात खूप चैतन्य असते. त्यांची वाढही चांगली होते. परंतु हे काही झाडा-फुलांच्या बाबतीत लागू आहे.

उदाहरणार्थ मला असे तुम्हाला सांगावेसे वाटते की, येथे जी फुले उमलतात त्यांना अजिबात वास नसतो.

येथील सर्वच फुले बिनवासाची असतात. मी नेहमी सभोवताली सुवासिक फुले आढळतात का, याचा शोध घेत असते. पण मला नेहमी असे दिसून येते की, येथे फुलांचा आकार मोठा होण्यावरच भर दिला जातो. कुठेही इतकी मोठी फुले दिसणार नाहीत, एवढी ती फुले मोठी असतात. पण त्यांना अजिबात सुगंध नसतो.

पण तेच भारतासारख्या गरीब देशामध्ये पहाल तर, असे दिसून येते की, येथील फुलांमधून प्रचंड प्रमाणात सुगंध ओसंडत असतो. अगदी छोटी-छोटी फुले तुम्हाला इतरत्र कोठेही आढळून येत नाहीत याचे वैशिष्टय काय बरं असेल?

तुमच्याकडे काही मोजक्याच फुलांना अगदी थोडासा सुगंध असेलही ! परंतु अतिशय जोपासना करूनही वाढवलेल्या जवळजवळ सर्व झाडांच्या फुलांनाच अजिब्रात सुगंध नाही.

भरतात तर बऱ्याच रानटी फुलांनादेखील खूप सुगंध असतो.याचे रहस्य काय असेल?

असं म्हटलं जातं की भारतातील मातीलाच एक प्रकारचा सुगंध असतो. मातीला कसा काय सुगंध प्राप्त होतो?

पण ही मात्र वस्तुस्थिती आहे. खरं आहे हे ! भारतातील मातीला एक प्रकारचा सुगंध असतो. या मातीत जी जी फुले येतात, त्यांना बहुतेक वेळा सुगंध असतोच.

परंतु येथे मात्र असे आढळत नाही. येथेच काय, पण असे कोणत्याच इतर देशांमध्ये आढळून येत नाही. तुम्ही नॉर्वेला जा नाहीतर तुम्ही जर्मनीला जा. सगळीकडे तीच परिस्थिती !

खरंच ! फुलांना सुगंधच नसणं ही एक धक्कादायक बाब आहे !

जेव्हा हे जग निर्माण केले गेले तेव्हां कुठेही सुगंधाचा गंध नव्हता पण तरीही भारतासारख्या भूमीत मात्र सुगंध आढळून येत होता.

खरंच येथे फुलांना सुगंध नाही यावर विश्वासच बसत नाही.

तुम्हा सर्वांचा जन्म आता येथे झाल्याने येथील भूमीला सुगंध प्राप्त झाला आहे.

आता तुम्ही सर्व आत्मसाक्षात्कारी लोक असल्यामुळे सर्वत्र पसरविण्यासाठी असा सुगंध तुमच्यापाशी आहे. तेव्हां तुमच्यावर आता खूप जबाबदारी आहे. मला वाटतं तुम्हाला मिळालेला सुगंध तुम्ही पसरवायला हवा. सुगंध हा अंतर्गत असतो.

जरी येथील माती ही सुगंध विरहीत असली, तरी येथील लोकांच्या वागणुकीमध्येच, त्यांच्या समजूतदारपणातच त्यांच्या चारित्र्यातच एक प्रकारचा सुगंध आहे.

जरी अजून त्यांना मानसिक शांतता प्राप्त झालेली नसली तरी त्यांना त्याची ओढ आहे. हीच गोष्ट त्या माणसांमध्ये सुगंध आहे असे दर्शविते. माणसातील सुगंध म्हणजे तरी काय? तर त्याचा सुस्वभाव, योग्य रहाणे, इतरांशी चांगले वागणे हेच आहे.

अजूनही तुम्हाला सुगंधी बनायला हवं आहे अशी जागरुकता सर्व राष्ट्रांमध्ये आलेली दिसत नाही. जर त्यांना तशी जागरुकता आली, तर सर्व युध्दजन्य परिस्थिती नाहीशी होईल आणि त्यांना आपल्यातील एकीचा साक्षात्कार होईल.

सर्वजण नुसते हा तुझा देश, हा माझा देश असे करीत भांडत बसतात. खरं पहाता, ही भिन्नता देवाने घडविलेलीच नाही. हे आपणच बनविले आहे. कोणताही एखादा देश हा कुणाच्याच मालकीचा नसतो. तर तो फक्त ईश्वराचाच असतो. पण लोक मात्र खुळ्यासारखे हा माझा देश, हा तुझा देश असे म्हणत भांडत बसतात.

मी आत्तापर्यंत अनेकदा सर्व जगभर प्रवास केलेला आहे. अगदी कोणत्याही देशास मी त्यांच्या स्वत:च्या मालकीचा देश असे म्हणणार नाही. कारण जर तुमच्या मालकीचा तो देश असेल, तर त्यात प्रेमाचा सुगंध दिसून यायला हवा.

तुमचा स्वभावच असा असायला हवा की आपोआपच तुम्ही त्या सुगंधी देशाचे नागरिक म्हणून ओळखू याल.

तुम्ही कोठेही जा. तेथील वर्तमानपत्रात हेच असते की, सर्वजण आपापसांत भांडत आहेत. राष्ट्राराष्ट्रांतील भांडणे तुम्ही पाहताच. ही माणसाची भांडणाची प्रवृत्ती सैतानाकडून आलेली असते असे मला वाटते. अशी माणसे, त्यांच्या स्वत:सकट सर्व जगाचा विध्वंस करू पाहतात. हे असे सर्व चाललेले पाहून आपण शरमिंदे होतो. म्हणून सर्व सहजयोग्यांनी कोणत्याही प्रकारची भांडणे,कलहास दुजोरा देऊ नये.

सहजयोगी येथे आहेत, ते लोकांना आनंद देण्यासाठी, सुगंध देण्यासाठी. भांडणासाठी नव्हेत.

सहजयोग्यांचे हे आद्य कर्तव्य आहे की, त्यांनी सर्व प्रकारच्या वादापासून अलिप्त रहावे. या भांडखोर प्रवृत्तीमुळेच सामंजस्याचा सुगंध नष्ट झाला आहे. जर लोक प्रेमळ आणि सहृदय झाले तर भूमी आपोआपच सुगंधित होईल.

सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे आपण एकमेकांवर प्रेम केले पाहिजे, द्वेष नव्हे.द्वेषाचे अनेक प्रकार आहेत आणि द्वेष करणे हा एक दुर्गुणच आहे. मानवतेवर प्राणी एकमेकांचा द्वेष करतात. परंतु मानवानी मात्र तसे वागता कामा नये.

आपण सर्व मानव आहोत. त्यामुळे आपले एकमेकांवर प्रेम असले पाहिजे. आपण कोणत्याही प्रकारे एकमेकांचा अजिबात तिरस्कार करता कामा नये.

तुम्ही सर्व सहजयोगी असल्यामुळे तर तुम्हाला मला असे सांगावेसे वाटते की, तुम्ही सर्वांनी एकमेकांवर टीका करण्यापेक्षा, आक्रमकपणा करण्यापेक्षा, तुमच्यातील प्रेमशक्ती वाढवा.

एकमेकांवर टीका करणे सोपे असते परंतु हे जाणून घ्या की येथील भूमीमध्ये जर सुगंध आणायचा असेल तर तुम्हाला एकमेकांशी अतिशय प्रेमळपणाने वागायला हवं. हे फार महत्त्वाचे आहे. सृष्टीची निर्मिती ही या प्रेमशक्तीतूनच झालेली आहे.

ही सर्व निर्मिती कशासाठी? तर तुम्हाला चांगले वाटावे, निसर्गातील सौंदर्य अनुभवता यावे आणि निसर्गाशी तद्रूप होता यावे, यासाठीच तर हे सर्व ! मानवजातीचे मात्र त्यादृष्टीने पुरेसे सह्कार्य लाभलेले दिसून येत नाही.

अर्थात सहजयोगी असे नाहीत. कारण सहजयोग्यांनी प्रेमशक्तीचे महत्त्व जाणलेले आहे. ते दुर्मीळ आणि अद्‌भूत आहेत. ते प्रेमशक्तीचा आदर करत असल्यामुळे चांगले कार्य करू शकतात. तुम्ही इतरांवरही प्रेम करताना दिसून आले पाहिजे. कारण हे पाहून इतरांना तशी प्रेरणा मिळणार आहे.

एकमेकांतील कलहासाठी,तसेच द्वेष करण्यासाठी विश्वाची निर्मिती झालेली नसून संपूर्ण विश्वाची निर्मिती होण्यामागचे कारण म्हणजे प्रेमशक्तीच होय. अन्यथा इतक्या सर्व खंडांवर, विविध राष्ट्रांवर इतकी शक्ती खर्च करण्याची काय आवश्यकता होती? तर एकमेकांवर प्रेम करण्यासाठी, सलोख्याने रहाण्यासाठी ही निर्मिती.

सहजयोगात तुम्ही एकमेकांवर प्रेम करायला शिकता व त्यामुळे तुमच्यात विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागून तुमच्या अवतीभवती, सर्व ठिकाणी तुम्हाला बंधू भगिनीच दिसू लागतात.

आज मी येत असतांना सर्व युरोपातील लोक तसेच भारतातील लोक आलेले पाहून मला फार आनंद झाला.हे कसे शक्य झाले? याचे कारण तुमच्यातील आंतरिक प्रेमशक्तीमुळेच हे घडून येते. म्हणून तुम्ही जेथे जेथे जाता, ज्या ज्या कुणाला भेटता त्या त्या सर्वांनी असे म्हटले पाहिजे की सहजयोगी म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून शुद्ध किंवा निखळ प्रेम होय! एका सहजयोग्याचे दुसऱ्या सहजयोग्यावर अपार प्रेमच असते. मग तुम्ही कोण आहात, कोणत्या पदावर आहात, या गोष्टींचे त्याला काहीही सोयरसूतक नसते.

ही एक अतिशय महत्त्वाची प्राप्ती आहे. कारण त्याआधी मानवामानवात जिव्हाळ्याचा सुगंध नव्हता आणि त्यामुळे साहजिकच भूमीत तरी कुठून येणार?

आता मात्र तुमच्यात, एकमेकांविषयी जिव्हाळा निर्माण झाला आहे. एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती, एकमेकांना सहकार्य करण्याची क्षमता तुम्हांला प्राप्त झाली आहे. कोणत्याही प्रकारे दुसऱ्यास अपमानित करणे, दुसऱ्यावर टीका करणे, एकमेकांची उणीदुणी काढणे योग्य नाही, असा विवेक तुम्हाला प्राप्त झालेला आहे. हे मी तुम्हाला सांगत आहे. कारण, सहजयोगी असल्यामुळे तुम्ही सर्व विशेष लोक आहात.

पहा बरं ! तुमच्या अवतीभवती किती लोक सहजयोगातील आहेत? फारच थोडे!

आपल्याला असे सहजयोगी अधिकाधिक हवे आहेत की जे या खऱ्याखुऱ्या प्रेमशक्तीच्या साम्राज्याचे अविभाज्य घटक बनून राहतील. असे जेव्हां घडेल, तेव्हां सहजयोगाच्या निर्मितीचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

सर्वांनी एकमेकांना समजून घेतले पाहिजे. एकमेकांना मदत केली पाहिजे. आणि माझी अशी नक्की खात्री आहे की सहजयोगी तसंच वागतात, एकमेकांवर प्रेम करतात्त. परंतु त्यातही अजून उदात्तपणा यायला हवा.

पुष्कळ लोकांना हेच कळत नाही की, सहजयोग हा फक्त त्यांच्याचसाठी नसून संपूर्ण जगतासाठी आहे. तुम्हाला तो इतरांना द्यायचा आहे आणि तुम्हाला प्रेम व ऐक्य प्रस्थापित करायचे आहे.

प्रेमामध्ये आपल्याला दुसऱ्याच्या चुका दिसतच नाहीत. आपण फक्त त्या प्रेमशक्तीचा आनंद घेतो. हेच आजच्या पूजेमध्ये आपल्याला अनुभवायचे आहे.

कळतनकळत आपण कुणाबद्दल द्वेष, तिरस्कार तर करत नाही नां? कोणत्याही राष्ट्राबद्दल किंवा कोणत्याही व्यक्तिबद्दल आपल्या मनात दुस्वास तर नाही नां?

तुम्ही सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याचा प्रयत्न करा. जर तुम्ही खरेखुरे सहजयोगी असाल तर तुम्ही कुणाचाही द्वेष न करता, तुम्ही स्वत:इतकेच इतरांवरही प्रेम कराल.

ईश्वरानी मानवाला देऊ केलेली सर्वात श्रेष्ठ गोष्ट काय असेल तर ती म्हणजे प्रेमभावना. आपल्याला या शक्तीचा वापर करायला शिकलं पाहिजे, व तशी वृत्ती विकसित केली पाहिजे.

आजचा हा दिन साजरा करण्यासाठी आपण सर्व एवढ्या लांबून येथे आला आहात हे पाहून फार आनंद वाटला.

आता जर सर्वत्र सहजयोग खूप पसरला आणि सर्वत्र सहजयोगी आणि सहजयोगीच झाले तर तुमचे कार्य सफल झाले असे म्हणायला हरकत नाही. कारण तेव्हां तुम्ही तुमच्यातील एकत्वाचा दिव्य आनंद उपभोगीत असाल.

हे प्रत्येकाने आपण सर्व एकच आहोत या भावनेने करायला हवे.

एखाद्यावर टीका करण्याची किंवा त्याचा द्वेष करण्याची काहीही गरज नसते. मात्र एकमेकांवर प्रेम करणे हे अत्यंत गरजेचे असते. जरी हे बऱ्याच सहजयोग्यांना साध्य झालेले असले तरी अजूनही काही लोक या पातळीपर्यंत पोहोचलेले नाहीत असे दिसून येते.

सहजयोग म्हणजे एकाकार भावना होय!

जरी आपण सहजयोगी अस्तित्वाने भिन्न असलो तरीही एकाच प्रेमशक्तीचे अंगप्रत्यंग आहोत. जर तुम्हाला हे खरंच कळले, तर तुम्ही आजचा शुभदिन हा खऱ्या अर्थाने साजरा केलात असे होईल!

आदिशक्तीने या सर्व जगाची उत्पत्ती का केली? हे सर्व असे का घडून आले?

आपल्या हे लक्षात कसे येत नाही ? की एवढी प्रेमशक्ती, इतकी सुबत्ता आपल्याला का दिली गेली ? आपण कुठे आहोत, आपल्याला काय प्राप्त झाले आहे हे आपल्या ध्यानी येत नाही. ह्या पेक्षा महत्त्वाचे म्हणजे आपल्याला प्रेमशक्ती प्राप्त झालेली आहे. जेव्हा तुम्हाला त्याचे महत्त्व कळेल तेव्हा तुम्ही खरच एकमेकांवर प्रेम कराल आणि एकमेकांविषयीची तिरस्काराची भावना, सूडभावना ही निघून जाईल आणि शिल्लक राहील ते म्हणजे निव्वळ प्रेम, प्रेम आणि प्रेम. हाच तर आजचा संदेश आहे. आपल्या सर्वांना एकदम प्रेमळ बनले पाहिजे.

आपल्याला आपल्या आईविषयी कसे प्रेम असते? तो प्रेमभाव जसा व्यक्त होतो, त्याचप्रमाणे आपणही सर्वांनी एकमेकांशी प्रेमळपणे राहणे महत्त्वाचे आहे. आणि आज तुम्हाला असा दृढनिश्चय करायचा आहे.

लोक आपल्या कुटुंबात देखील एकमेकांवर निर्व्याज प्रेम करत नाहीत. मी अशा लोकांशी बोलत देखील नाही.

आज जगामध्ये सर्व प्रकारची भांडणे, कलह आणि विविध प्रकारचे हेवेदावे चालू आहेत, सर्व जगानेच यातून बाहेर येऊन एकमेकांवर शुद्ध प्रेम करायला शिकले पाहिजे. याशिवाय दुसरा मार्गच नाही. पण त्या प्रेमात अजिबात हेतू असता कामा नये, तर फक्त आनंद हवा. तो आनंद तुम्ही स्वतः अनुभवा आणि इतरांना द्या.

मला खात्री आहे की तुम्ही सर्व सहजयोगी तसे वागत आहात आणि कुणीही कुणाच्या उणिवा पहात नाही आणि दुसऱ्यांना त्रास देत नाही, अगर कुणाला अडचणीत आणत नाही.

प्रेम हाच आदिशक्तीचा संदेश आहे. पहा, एकट्या आदिशक्तीने संपूर्ण विश्वाची निर्मिती आणि योजना याच कार्यासाठी केली असेल? खरच! ही काही सोपी गोष्ट नाही. हे साध्य झाले याचे कारण म्हणजे केवळ तिची प्रेमशक्ती होय. तिचे प्रेम म्हणजे तुम्हा सर्वांच्या एकत्वाची अभिव्यक्ती होय! आणि म्हणूनच तिच्याशी एकरूप होण्यासाठी प्रत्येकाने प्रेम करणे शिकले पाहिजे. अर्थातच त्यासाठी तुम्हाला क्षमाशील बनायला हवं!

जर दुसऱ्याला क्षमा कशी करायची हे तुम्हाला ठाऊकच नसेल आणि दुसऱ्याच्या सतत चुकाच काढत राहिलात तर तुम्ही दुसऱ्याला मदत करूच शकणार नाही.

आता तुमचं काम असं,की तुम्हाला अतिशय प्रेमळ बनायचं आहे. कुणाही बद्दल द्वेष, मत्सर, हाणामारी असे विचार अजिबात मनात आणायचे नाहीत. खरंच असं व्हायला पाहिजे. हे सर्व घडून

येईल असा मला विश्वास आहे.

संपूर्ण युरोप खंडातील देश तसंच भारत यांच्यातील विकसित झालेले देश असो अथवा विकसनशील देश असो, या दोहोंतील लोक भांडतानाच दिसतात.

केवळ त्यांच्या भांडणाच्या रीतीच काय त्या वेगळ्या! हाच काय तो फरक! पण दोघांमध्ये प्रेमभावना शून्य!

समजा मी एखाद्या देशामध्ये गेले, तर त्या देशाबद्दल टीका करणं हे अगदीच सोपे असते. परंतु मूलत: ते सर्व चांगले आहेत तर हे त्यांच्या लक्षांत आणून देणे, हे अधिक श्रेयस्कर . टीका करण्यापेक्षा त्या लोकांना या प्रेमशक्तीचं महत्त्व मी समजावून दिले पाहिजे आणि त्याचा आनंद लुटायला शिकवले पाहिजे. खरोखरच या मार्गानि गेल्यास कुठलीच अडचण उद्‌भवणार नाही. केवळ मानवालाच प्रेम करणे साधते. प्राणी सुद्धा एकमेकांवर प्रेम करतात, पण ते मर्यादितच असते.

सर्व मानवजातीतील लोक एकमेकांवर भरभरून प्रेम करतील तर त्याची चमक दिसूनच येईल. म्हणून एकमेकांवर उथळ किंवा मतलबी प्रेम न करता, निरपेक्ष प्रेम करा. म्हणजे त्याचा आनंद सर्वांना लुटता येईल.

प्रेम कसे करायचे हे नीट जाणून घ्या. प्रेम म्हणजे काही लोक जे समजतात ते अत्यंत हास्यास्पद असते. म्हणून प्रत्येकाला प्रेम म्हणजे काय हे आधी नीट समजले पाहिजे. आणि तुम्ही करत आहात ते प्रेम आहे की नाही हेही समजले पाहिजे.

जर तुम्ही या जगतावर खरंच प्रेम करत असाल, या परमेश्वराच्या निर्मितीवर तुमचं खरच प्रेम असेल तर तेथे भांडण तंटे होणारच नाहीत.

ज्याप्रमाणे एखादी आई आपल्या मुलाकडे जेवढ्या आत्मीयतेने पाहते, त्याचप्रमाणे,तेवढ्याच आत्मीयतेने तुम्ही या ईश्वरनिर्मित जगतातील सर्वांकडे पाहिले पाहिजे.

हा विषय इतका गहन आहे की मी त्यावर तासन तास बोलू शकेन! पण त्यातून तुम्हाला इतकंच घ्यायचं आहे की एकमेकांवर प्रेम करा व एकमेकांना समजून घ्या.

लहान मुलांकडे पहा ! ती एकमेकांवर किती प्रेम करतात! अजून ती मुले एकमेकांचा द्वेष करायला शिकलेली नसतात. परंतु जर मुलांना वाढवताना योग्य संस्कार झाले नाहीत तर मात्र ती एकमेकांचा द्वेष करू लागतात. अगदी हास्यास्पदरीत्या वागतात.

एकूणच अशा प्रकारे अनेक देशांमध्ये संघर्ष चालू आहेत. याचे कारण त्यांच्यात अजिबात प्रेम नाही.

म्हणून आता सहजयोग्यांना हे एक मोठं काम आहे की प्रेम हेच सर्वश्रेष्ठ आहे हे त्यांनी सर्वांना दाखवून दिले पाहिजे.तुम्ही हिंदू असा नाहीतर ख्रिश्चन ! त्याचा काहीही संबंध नाही. प्रत्येकाला प्रेम करण्याचा अधिकार आहे.जर तुम्ही स्वत: असे आचरण करून सर्वांना दाखवून दिलेत, तर सहजयोग आणखी रुजेल.

सहजयोग हा एका वृक्षाप्रमाणे आहे की ज्याला प्रेमजलाची जरुरी आहे.

तुमच्या सभोवताली तुम्ही अशा प्रकारे प्रयत्न करा. प्रेम करण्यामुळे कशाप्रकारे लाभ होतो हेही तुमच्या लक्षात येईल. तुम्ही किती खर्च करता, तुम्ही काय करता, याच्याशी काहीही देणे घेणे नाही.

हे एखाद्या महासागरासारखे अथांग आहे. तुम्ही सहजयोगाचे विशिष्ठ व्यक्तिमत्व बनून जाता.

म्हणून आज सर्व सहजयोग्यांनी निश्चय करायचा आहे की आपण ज्यांचा द्वेष, राग करतो, त्यांना आपण क्षमा करून त्यांच्यावर सर्वांनी प्रेमच करायचे आहे.

तसं घडतं की नाही हे आपण पाहुया !

मला खात्री आहे की तसे घडेलच !याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहात, आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे प्रेमशक्ती हे परमेश्वराचे मानवाला मिळालेले वरदानच होय ! जर ते तुम्ही वापरले, तर मानवाला काही प्रश्नच उरणार नाहीत !

सर्वांना अनंत आशीर्वाद.

● ● ●

## जागतिक सहजयोग संघटनेचा स्थापना दिवस प्रथम वार्षिक समारंभ

रविवार दि.८ जुलै २००७ , इटली.

जागतिक सहजयोग स्थापना झालेल्या घटनेस वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जमलेल्या सहजयोग्यांनी श्रीमाताजींना फुलांचा गुच्छ अर्पण केला त्याचा श्रीमाताजींनी प्रसन्न मुद्रेने स्वीकार केला. सर सी.पी.यांच्या समवेत सर्व सहजयोग्यांना पाहून त्या खूपच आनंदी व प्रसन्न दिसत होत्या.

गेल्या वर्षभरामध्ये केवळ श्रीमाताजींच्या आशीर्वादाने बरेच कार्य होऊ शकल्याबद्दल 'अल्डो गणडॉल्फी'यांनी प्रसंगाच्या अनुरोधाने प्रथम श्रीमाताजींचे आभार मानले.यानिमित्ताने श्रीमाताजींच्या चरणावर केक अर्पण करण्यात आला. श्रीमाताजींनी केकचा आनंद घेतला आणि उरलेला केक सर्व सहजयोग्यांना देण्यास सांगितले.

या विषेश प्रसंगाच्या निमित्ताने अर्जेंटीना येथील सहजयोग्यांनी श्रीमाताजींना मेणबत्ती ठेवण्याचा स्टॅण्ड भेट दिला, आफ्रिका येथील सहजयोग्यांनी श्रीमाताजींना सहजयोग प्रसार-प्रचारासाठी केलेल्या सर्व कार्याचा आढावा दिला. कबेल्याजवळील सहजयोगिनीने श्रीमाताजींना फुले भेट दिली. तसेच 'रोम' मधील एका सहजयोगिनीकडून श्रीमाताजींना शहरामध्ये केलेल्या पब्लिक प्रोग्रामच्या फोटोंचा अल्बम भेट दिला.

सदर कार्यक्रमाच्या वेळी श्रीमाताजींच्या दर्शनाने सर्वजण आनंदी झाले.

●●●

## श्रीमाताजींची डॉक्टर्स व परिचारिकांसमवेतची एक भेट

बुधवार दि. ११ जुलै २००७,इटली

श्रीमाताजींनी सर सी.पी.समवेत श्रीमाताजींच्या शयनकक्षेत ऑस्ट्रेलियामधून नुकत्याच कबेल्यात आलेल्या डॉक्टर्स व परिचारिकांच्या ग्रुपची भेट घेतली. त्यावेळी श्रीमाताजी सर्वांकडे पाहून अत्यंत प्रसन्नपणे अत्यंत आनंदाने सर्वांकडे पहात स्मितहास्य करीत होत्या.

त्यावेळी त्यांनी श्रीमाताजींना सागरलाटांवर स्वार झालेल्या चार डॉल्फीनची सुंदर मूर्ती प्रेझेंट दिली. तसेच ऑस्ट्रेलियात खास बनविलेले सुगंधी अत्तर तसेच फुले भेट दिली. त्यावेळी श्रीमाताजींनी फुलांचा सुगंध घेतला व त्या उद्गारल्या की, 'खरे पहाता या फुलांचा सुगंध ही फुले ज्या मातीतून वाढलेली आहेत त्या मातीमधूनच सुगंध या फुलांमध्ये आलेला आहे.' भारतामध्येही फुलांना अशाच प्रकारे सुगंध आहे कारण तेथील भूमीही अत्यंत पवित्र आहे ' असा उल्लेख श्रीमाताजींनी केला.

श्रीमाताजींच्या प्रत्यक्ष सहवासात घालविलेल्या क्षणांच्या आनंदात सर्वजण श्रीमाताजींचा आशीर्वाद घेऊन बाहेर आले.

●●●

# युवाशक्ती सेमिनार, कबेला २००७ साठी युवाशक्तीने श्रीमाताजींना दिलेले प्रार्थनीय निमंत्रण

मंगळवार दिनांक ३१ जुलै २००७

कबेल्यामध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवाशक्ती सेमिनार २००७ साठी श्रीमाताजींना प्रार्थना करण्यासाठी आणि त्यांना आमंत्रण देण्याच्या संधीच्या निमित्ताने श्रीमाताजींना भेटण्यासाठी काही युवाशक्ती मुले -मुली श्रीमाताजींच्या महालामध्ये एकत्र जमली होती. श्रीमाताजींनी त्यांच्या महालात येण्यापूर्वी किती युवाशक्तीची मुले आली आहेत? असे श्रीमाताजींनी विचारले.शेवटी संपूर्ण जगभरातून कबेल्यात जमलेल्या युवा शक्तीपैकी संपूर्ण युवा शक्तीचे प्रतिनिधित्व करणारी सात युवा शक्ती मुले-मुली श्रीमाताजींना भेटण्यासाठी गेली.

श्रीमाताजींना युवाशक्ती सेमिनारचे निमंत्रण दाखविल्यानंतर निमंत्रण पत्रिकेचे डिझाईन कुणी केले आहे ते श्रीमाताजींनी विचारून घेतले. तसेच निमंत्रण पत्रिकेवरील चित्र अतिशय सुंदर असल्याचे श्रीमाताजी म्हणाल्या. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर निमंत्रण पत्रिकेतील प्रार्थना वाचून दाखविण्यात आली. 'हे निमंत्रणपत्र अतिशय सुंदर, मनाला स्पर्श करणारे आहे' असे श्रीमाताजी म्हणाल्या.

तसेच निमंत्रणपत्रामधील प्रार्थना वाचून दाखविल्यानंतर ती प्रार्थना खूप चांगल्या प्रकारे वाचली गेली त्यातील इंग्रजी अत्यंत चांगले होते असेही श्रीमाताजी म्हणाल्या. त्यानंतर दुबईवरून आणलेले 'सुगंधी अत्तर' श्रीमाताजींना भेट देण्यात आले. श्रीमाताजींनी आपल्या डाव्या व उजव्या मनगटास ते लावून घेवून त्याचा स्वीकार केला. श्रीमाताजींनी तेथे उपस्थित असणाऱ्या सर्व युवाशक्ती मुला-मुलींची उंची व साईज विचारून घेतली आणि त्यावेळी खोलीमध्ये जमलेल्या सर्व युवा शक्ती मुलांना कुर्ता पायजमा व मुलींना साड्या प्रेमाने भेट म्हणून देण्यात आल्या. त्यावेळी प्रत्येकाला भेट दिलेल्या कुर्ता-पायजमा व साडी प्रत्येकाला व्यवस्थित बसत आहे ना याकडे श्रीमाताजींनी विशेष लक्ष दिले. त्याबरोबरच दिल्या गेलेल्या कुर्ता- पायजमा, साड्यांचा रंग सर्वांना प्रत्येकाला आवडला आहे ना याची खात्रीही श्रीमाताजींनी करून घेतली. श्रीमाताजींनी त्यावेळी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले.

त्यानंतर सर. सी.पी.साहेबांनी निमंत्रण पत्राबद्दल विचारल्यानंतर पुन्हा निमंत्रणपत्रक श्रीमाताजी व सर सी.पी.पुढे सादर करण्यात आले. उपस्थित युवा शक्तीपैकी एका युवा शक्तीने पूर्वीच्या सेमिनारमधील काही घटनांचा उल्लेख श्रीमाताजींसमोर केला. सेमिनारमध्ये १९८५ मधील ब्रिटन येथील गणेशपूजेमध्ये श्रीमाताजींनी 'पावित्र्य 'या विषयावर दिलेले भाषण पाहिले असल्याची माहिती श्रीमाताजींना देण्यात आली.यावर श्रीमाताजी म्हणाल्या की, ही कल्पना खूप छान आहे , केवळ सहजयोगाच्या माध्यमातून तुम्ही स्वत:ला ओळखू शकता. त्यामुळे तुम्हाला स्वत:ला ओळखण्यासाठी सहजयोग मनापासून करायला हवा' त्यानंतर सुवर्णधातूच्या कड्याच्या चौकटीमध्ये असणारा अतिशय सुंदर श्रीमाताजींचा फोटोग्राफ नंतर श्रीमाताजीना भेट देण्यात आला. फोटोग्राफ कडे पहात असताना 'हा फोटोग्राफ कुणी काढला' असे श्रीमाताजीनी विचारले.

आणखी युवाशक्तीच्या मुलांची आपल्या दर्शनासाठी येण्याची इच्छा असल्याचे श्रीमाताजींना सांगितल्यावर श्रीमाताजी म्हणाल्या का ते ? त्यानंतर विविध देशांमधून ३०० युवाशक्ती सेमिनारसाठी जमले असल्याची माहिती दिल्यानंतर उपस्थित युवाशक्तीच्या संख्येबद्दल श्रीमाताजींनी आश्चर्य व्यक्त केले.सेमिनारमध्ये १६ ते २७ या वयोगटामधील युवाशक्ती सहभागी झाले असल्याचे सांगितले. तसेच या वयोगटापेक्षा कमी वयोगटामधील लहान मुले डगलीओमधील लहान मुलांसाठीच्या शिबिरामध्ये दरवर्षी सहभागी होत असल्याचे श्रीमाताजींना सांगण्यात आले. श्रीमाताजींनी या सर्व गोष्टींबद्दल खूप समाधान व्यक्त केले.श्रीमाताजीनी आत्ता युवाशक्तीचा नेता कोण आहे याबद्दल चौकशी केली. त्यावेळी कोणी नेता नसून सर्व युवाशक्ती हाच एक मोठा समूह असल्याचे श्रीमाताजींना सांगण्यात आले. युवा शक्ती मुले-मुली आपल्या प्रिय आईसाठी काही भजने कव्वालीज बसवित असल्याची माहितीही युवा शक्तींनी दिली. युवाशक्ती मुला-मुलींनी श्रीमाताजींना नमस्कार केल्यानंतर श्रीमाताजींनी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले. ● ● ●

## आदिशक्ती पूजेपूर्वी श्रीमाताजी बास्केट्सचा स्वीकार करताना
### रविवार दिनांक २८ जून २००७

कबेल्यामधील आईबरोबरील आणखी एक सुंदर अनुभव

आदिशक्ती पूजेसाठी महालामधून निघण्यापूर्वी काही वेळ आधी विविध देशांमधून ४० पाहुण्या स्त्रियां जमल्या होत्या.त्यांना श्रीमाताजींच्या निवासस्थानापासून पूजेच्या ठिकाणापर्यंत श्रीमाताजींसोबत पूजेसाठी जाण्याची सुवर्ण संधी मिळाली. त्यांनी श्रीमाताजींना देण्यासाठी काही पारंपारीक पर्सेस, बास्केट आणल्या होत्या.

दुपारच्या जेवणामध्ये स्वीडन, नॉर्वे, स्पेन, लिथूनीया, फ्रान्स, डेन्मार्क, आणि इतर काही देशातील स्त्रियांनी आपापल्या देशामधून ज्या सुंदर लक्ष्मी बास्केट्स श्रीमाताजींना भेट देण्यासाठी आणल्या होत्या त्या सर्व त्यांनी एकत्र केल्या आणि राष्ट्रीयत्वानुसार नव्हे तर विविध रंगानुसार नीटनेटकेपणाने त्या लावून ठेवण्याची सुंदर युक्ती त्यांना सुचली व त्याप्रमाणे त्यांनी त्या लावून ठेवल्या.

श्रीमाताजींना याबद्दल कोणीच कल्पना दिली नव्हती त्यामुळे प्रत्येक पर्स ही मूळची कोणत्या राष्ट्रातून आणलेली आहे हे श्रीमाताजींना ओळखण्यास लावण्याचा एक सुंदर मजेदार आनंददायी अनुभव सर्वांना श्रीमाताजींच्या कृपेत मिळाला.

●●●

## हॉटेल पिझेरीयामध्ये श्रीमाताजींचे आगमन
### रविवार दिनांक २१ जुलै २००७

आजच्या सायंकाळी श्रीमाताजी सर सी.पी.श्रीवास्तव साहेबांसोबत पॅलॅझो डोरीआ या ठिकाणाहून एका छोटयाशा फेरफटक्यासाठी निघाल्या आणि त्यावेळी अचानक श्रीमाताजींनी छान इटालीअन पदार्थ खाण्याची इच्छा दर्शविल्यामुळे त्यांचे 'पिझरीआ' या हॉटेलमध्ये आगमन झाले.


पिझारीआ हॉटेलच्या मालकाने श्रीमाताजींना अत्यंत नम्रपणे खास निमंत्रितांसाठी असलेल्या हॉलमध्ये बसण्याची व्यवस्था केली. त्यादरम्यान त्याठिकाणचे सर्व सहजयोगी एकत्र जमले आणि अचानक ही श्रीमाताजींच्या दर्शनाचा लाभ सर्वांना मिळाला.

आपल्या परमेश्वरी आईला असे अचानक पाहून त्या हॉटेलमधील सर्व वेटर्स श्रीमाताजींचे आदरातिथ्य कसे करावयाचे या विचाराने गोंधळून गेले. जेव्हा सहजयोगी श्रीमाताजींच्या हॉलमध्ये जमले त्यावेळी श्रीमाताजीनी सर्वांना सर सी.पी.साहेब व त्यांच्यासोबत जेवण करण्याचे सांगितले.

श्रीमाताजींच्या त्या दोन अविस्मरणीय तासांच्या सहवासानंतर सर.सी.पी.साहेब जमलेल्या सर्व सहजयोग्यांना म्हणाले की, आपण एकच कुटुंब आहे आणि हे सर्व आपल्या आईमुळेच शक्य आहे त्यामुळे यासर्वांसाठी मी श्रीमाताजींचे व तुम्हा सर्व प्रेमळ सहजयोग्यांचे आभार मानतो.'

●●●

# आदिशक्ती पूजा, जून २००७









७ जुलै २००७














# २१ जुलै २००७













८ जुलै २००७





२० जुलै २००७





२४ जुलै २००७





## श्रीमाताजींच्या सहवासात डॉक्टरांची सभा
नवी दिल्ली, दिनांक २५ मार्च १९९३
(सारांश)



जगात आपल्याला आढळून येणारे सर्व प्रश्न माणसांनीच निर्माण केलेले आहेत हे लक्षांत घ्या. या सर्व प्रश्नांच्या मुळाशी हीच चक्र आहेत . सर्व चक्र जर ठीक करता आली तर सर्व प्रश्न अर्थातच ठीक होणार आहेत.

एकदा तुम्ही सहजयोगी झालात तर तुम्हाला कधीच कुठलाही त्रास होणार नाही. तुम्ही नेहमी निरोगी, उत्साही आणि मधुर स्वभावाचे व्हाल. याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे तुम्ही जीवनात आनंदी रहाल व आनंदी वाटाल.

आज आपल्याकडे सहजयोगी असलेले पुष्कळ डॉक्टर्स आहेत. त्यासर्वामध्ये समान असलेला गुणधर्म म्हणजे कनवाळूपणा व दया. हे पैशाच्या मागे धावणारे डॉक्टर्स नव्हेत.समाजात ज्या गरीब लोकांना वैद्यकशास्राचा फायदा मिळत नाही अशा लोकांना मदत करणारे हे सर्वजण आहेत.त्यांच्यामधील दुसरा चांगला गुण दिसला तो म्हणजे त्यांची दया व प्रेमळ वृत्ती. ज्याच्यामुळे ते सहजयोगाकडे वळले. सहजयोग हा सर्व दृष्टीने पवित्र आहे. मंगल आहे. तुम्हाला एक सिद्धांत सांगायचा म्हणजे तुम्ही मनाची दारे उघडी ठेवा आणि आपला भारतीय वसा विसरू नका. तो भारतात बाहेरून आला नाही, तो इथे पूर्वापार आहे. मी सहजयोग सांगितला हे म्हणणे चूक आहे. वर्षानुवर्षे तो इथे आहे आणि आपल्याकडील सर्व संत मंडळी वारंवार तेच सांगत आले आहेत. आतां आपल्याला एकाचवेळी अनेक लोकांना एकसाथ जागृती देण शक्य झाल आहे. एवढाच फरक. प्रत्येक नवीन शोध म्हटला की, त्याची प्रत्यक्ष सिद्धता असावी लागते. आतां आपल्याला विद्युतशक्ती माहीत आहे.प्रथम तो प्रकाश फक्त एकाच माणसाला दिसला. जोपर्यंत अशी वस्तू सर्वांना मिळत नाही तोपर्यंत त्याला अर्थ नाही. मानवी उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा म्हणजे त्याच्यामधली कुंडलीनी शक्ती जागृत होणे. आपण जाणिवेतल्या वरच्या थरात गेलो म्हणजे या सहजयोगी डॉक्टरांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी पटू शकतात व समजू शकतात.

आपल्याला माहीत आहे की वैद्यकशास्त्रात इतकी प्रगती होऊनही माणसांचे प्रश्न त्यांच्या समस्या संपलेल्या नाहीत. मुख्य म्हणजे पॅरा-सिंपथेटिक सिस्टिम बद्दल आपल्याला काहीच माहीत नाही. एरवी सिंपथेटिक सिस्टिम तुम्ही सुधारू शकाल पण सहजयोगात पॅरा सिंपथेटिक सिस्टिम देखील समजू शकाल व सुधारू शकाल.हे कसे ते पहा. आता हा मायक्रोफोन आहे. आधी मोठ्याने बोलल्या शिवाय सर्वांना ऐकू येत नसे. पण आता या मायक्रोफोनमुळे ती अडचण दूर झाली. अडाणी माणसाला ही एक विचित्र वस्तू वाटेल. पण विजेच्या प्रवाहाशी जोडल्याबरोबर ती काम करू लागली. त्याचप्रमाणे आपल्या मूळ स्रोताबरोबर, आत्म्याबरोबर आपण निगडित होत नाही तोपर्यंत आपल्याला स्वत:ची खरी ओळख होत नाही. म्हणूनच मग सारे हे वाद-विवाद.

सर्वात महत्त्वाची गोष्ट-म्हणजे आपला परम चैतन्याशी संपर्क जुळून आला पाहिजे. त्यालाच परमेश्वराची प्रेम शक्ती म्हणतात. मी म्हणते म्हणून त्यावर तुम्ही विश्वास ठेवा असं नाही. मी एक तत्व-सिद्धांत-तुमच्याबरोबर सांगते की ही परमेश्वराची शक्ती या सृष्टीमध्ये सर्वत्र अस्तित्वात आहे. असं पहा, मातेच्या उदरात गर्भ मातेच्या उदरातच वाढतो, तिथेच त्याची देखभाल होते आणि योग्य वेळी तो बाहेर फेकला जातो. हे सर्व कोण करतो? कसं होतं? तसच इथली ही वेगवेगळ्या तऱ्हेची व रंगाची फुलं पहा. निरनिराळ्या कोंबातून ती निर्माण झाली. ह्या सर्व जिवंत क्रिया कशा चालतात? ह्या

प्रश्नांना अंत नाही. पण जागृत झाल्यावर आत्मसाक्षात्कार झाल्यावर त्यांची उत्तरं मिळतात.

माणसाच्या त्रिकोणाकृती माकडहाडामध्ये साडेतीन वेटोळे घालून बसलेल्या शक्तीद्वारे हे संधान होते. काही लोकांच्या पाठीवर या शक्तीच्या जागृतीमुळे होणारं स्पंदन उघड्या डोळ्यांनी दिसू शकतं. ही शक्ती जेव्हा टाळूवरील रंध्रातून बाहेर पडून परमचैतन्यास मिसळते तेव्हा हे संधान घडून येते. ही एक महान शक्ती आहे.तिच्यात चुंबकीय गुण आहेत. प्राण आहे; म्हणून विचार करणे, उमजणें ऑर्गनायझेशन आणि सर्वात मुख्य म्हणजे प्रेम हे गुण आहेत.

दुसरे सत्य म्हणजे तुमचा खरा 'स्व' म्हणजे शरीर, मन, बुद्धी, अहंकार, बाह्य चेतना यापैकी काहीही नाही. कारण प्रत्येक वेळी या सर्वाचा आपण माझे शरीर, माझं मन वगैरेच आपण उच्चार करतो.

खरं म्हणजे तुमचा 'स्व'हा तुमचा आत्मा असतो. आपल्याला झाडाचं ज्ञान असतं. पानांना कीड लागली की आपण पानावर उपचार करतो. फांद्याना कीड लागली की फांद्यांना उपचार करतो. पण त्यामुळे सबंध झाड ठीक होणार का? त्याकरता आपल्याला त्या झाडाच्या मुळाशी गेलं पाहिजे. म्हणजेच तुम्ही आत्मा बनलं पाहिजे. मगच तुमचे सबंध शरीर ठीक होणार आहे. दुसरा एक सिद्धांत मी तुम्हाला सांगते की प्रत्येक मनुष्यप्राण्यामध्ये सात चक्रे आहेत. एक चक्र कुंडलिनीच्या खाली आहे आणि सहा तिच्या वरच्या बाजूला आहेत. ही सर्व चक्रं आपल्या जीवनातील सर्व शारीरिक, मानसिक,भावनिक,राजकिय सामाजिक आणि आध्यात्मिक स्तरांची मूळ (उगम)स्थानं आहेत.

जगात आपल्याला आढळून येणारे सर्व प्रश्न माणसांनीच निर्माण केलेले आहेत हे लक्षांत घ्या. या सर्व प्रश्नांच्या मुळाशी हीच चक्र आहेत . सर्व चक्र जर ठीक करता आली तर सर्व प्रश्न अर्थातच ठीक होणार आहेत.

वैद्यकीय शास्त्रात ज्याला प्लेक्सस म्हणतात ती हीच. आपल्या उजव्या बाजूकडची नाडी आपलं बौद्धिक कार्य बघते.मी आता स्वाधिष्ठान चक्राबद्दल तुम्हाला सांगते. या चक्रावर आपले सर्व प्रकारचे निर्मिती कार्य चालते. आपण जेव्हा विचार करतो तेव्हा आपल्यातील शक्ती (प्राण)खर्च करतो. हे कार्य मेंदूमधील ज्या पेशींच्या द्वारे होते त्यांना चरबीचा पुरवठा पोटातून या चक्राद्वारे मिळतो. म्हणून जे लोक खूप विचार करतात ते असंतुलित होतात. सदैव भविष्यकाळाचा विचार करणारी माणसे सारखे नियोजन करीत असतात. त्यामुळे या चक्रावर ताण येतो आणि त्याचे दुसरे कार्य म्हणजे लिव्हर. प्लीहा, किडणी, आतडे वगैरे भागांवर नियंत्रण ठेवण्याचे काम कमी होते. म्हणून या उजव्या बाजूकडे झुकलेल्या माणसांना प्रथम लिव्हरचे त्रास होतात. माझ्या कल्पनेप्रमाणे वैद्यकशास्त्रात लिव्हरचा अजून पुरेसा अभ्यास झालेला नाही. हे शरीरातील एक प्रमुख अंग आहे, लिव्हरमध्ये शरीरातील सर्व टाकाऊ व विषारी पदार्थ शोषले जातात व त्यांची उष्णता रक्तात पुन्हा सर्वत्र पसरते. तुम्ही सदैव विचारच करत राहिलात तर लिव्हरच्या या कार्यावर ताण पडून ते दुर्बल होते. परिणामी सर्व उष्णता पोटात साचून राहते. नंतर ही उष्णता हृदयाच्या उजव्या भागापर्यंत वर येते.त्यामुळे दम्याचा त्रास होतो. हीच उष्णता आणखी वर म्हणजे गळ्यापर्यंत आली की सर्दी-खोकला होतो, खूप शिंका येतात. लिव्हर दोन प्रकारचे असते, एक मरगळलेल आणि दुसरे अति-क्रियाशील. मी दुसऱ्या प्रकाराबद्दल बोलत आहे. ज्याच्यामुळे सर्दी,शिंका, पित्त,राग आणि मानसिक ताण होतात. एखाद्या तरुण माणसाला सुद्धा उष्णतेमुळे त्रास होऊ शकतो. तरुणपणी खूप टेनिस खेळणे किंवा असाच जोरदार व्यायाम करणे आणि त्याचबरोबर दारुचे व्यसन असल्यास तरुण वयातच तीव्र हृदयविकार होऊ शकतात. गळ्याभोवतालच्या उष्णतेमुळे घशाचे विकार होतात, आवाज घोगरा होतो. खाली ही उष्णता आली त्याचे पण काम बिघडते कारण या चक्रातून त्यांना उष्णता मिळेनाशी होते. अशामुळे मधुमेह होतो. अहोरात्र विचार करण्यामुळे मधुमेह होतो. महाराष्ट्रात चहाच्या कपांत इतकी साखर घालतात की त्यामध्ये चमचा उभा राहील. खेड्यात राहणाऱ्या माणसांना मधुमेह होत नाही कारण त्यांची राहणी साधी असते. उद्या काय याचा विचार कमी असतो. हे कसं करू ते कसं करू असे प्रश्न नसतात. सारखे बसून राहणाऱ्या लोकांना विचार, काळजी,

भविष्याची चिंता या व्यतिरिक्त उद्योग नसल्याने मधुमेह होतो.

तिसरी महत्त्वाची आणि भयानक गोष्ट म्हणजे आजकालच्या जीवनातील वेग, सध्या आपलं जीवन चमत्कारीक झाल्यामुळे आत्म्याचा विकास नीट होऊ शकत नाही. सकाळी पेपर उघडला की खून-मारामाऱ्या, बॉम्ब स्फोट याच रोज बातम्या. त्यामुळे प्लीहा डळमळते. तुम्हाला नीटपणे ब्रेक फास्ट करायला वेळ नसतो. घाई-गर्दीत रहदारीच्या घोळक्यातून कसंबसं कामावर जायची धावपळ. या सर्वामुळे रक्ती कर्करोग होण्याची भीती असते. या गडबडीत प्लीहाचे काम नीट होत नाही. तुमच्या उजव्या बाजूवरच अती ताण आल्यामुळे डावीकडे धक्का बसून प्लीहाचं काम थांबतं, सर्वव्यापी चैतन्याबरोबरच संधान तुटतं. मेंदू काम करेनासा होतो आणि ल्युकेमियाचा (रक्ताचा कॅन्सर) त्रास सुरू होतो. त्यानंतर किडनी आणि पुढे लघवीचा त्रास. अशा माणसाला डायलीसिसवर ठेवून शेवटी त्याचे आयुष्य दिवाळखोर झाल्यासारखे संपते. डायलिसीसमुळे आयुष्य लांबवण्याशिवाय इतर सुधारणा हो ऊ शकत नाही. लिव्हर नीट नसली की भूक कमी होते. शिवाय मलावरोधाचा त्रास सुरू होतो. काही लोकांना हा त्रास इतका होतो की रोज एनिमा घेतल्याशिवाय भागत नाही. अती क्रियाशील माणसांना अशा प्रकारचे त्रास होतात.

आणखी एक रोग म्हणजे अर्धांगवायू. आपल्या मेंदूच्या डावी व उजवी बाजू एक सारख्या नसतात. या दोन बाजू कपाळाच्या मध्यावर एकमेकांना छेदून उलटीकडे जातात. या ठिकाणी 'आज्ञा' हे महत्त्वाचे चक्र आहे. एकमेकांना छेदून वळल्यावर या नाड्यांच्या मधोमध असलेला भाग म्हणजे लिंबीक एरिया, जो फुग्यासारखा दोन आकारांनी वेढला गेला आहे. हे फुगे म्हणजे आपला अहंकार व प्रति-अहंकार किंवा अतिक्रियाशील अथवा अति पारंपारिक दबाव. कुंडलिनी आज्ञा चक्रावर आल्यावर हे दोन्ही फुगे शोषून घेते आणि वरील ब्रह्मरंध्रातून बाहेर पडून विश्वव्यापी चैतन्याशी मिसळून जाते. या क्रियेचा थकवा अजिबात येत नाही. मी आता सत्तर वर्षाची होऊनही जगभर इतका प्रवास करते, लोक म्हणतात हे तुम्ही कसे करू शकता? मी म्हणते मी करू शकते कारण मी करत नाही. मी फक्त बसून राहते. प्रवास करत आहे असे मला वाटतच नाही. मी कधी विचारच करत नाही, कारण त्यांतच खरी मजा आहे. सारं काही होत रहाते कारण तुम्ही त्या दैवी शक्तीच्या सान्निध्यात असता. ती एखाद्या महाकर्तृत्ववान मेंदूसारखी आहे. ती फार जलद कार्य करते. जसं एका क्षणांत सर्व काही होतं आणि तिला सर्व काही समजतं.

तुमच्या सर्वामध्ये ही कुंडलिनी आहे आणि तीच तुमची आई आहे. तुम्ही जे काही आहात.जे काही करता ते सारे तिच्यामध्ये एखाद्या टेप-रेकॉर्डसारखे नोंदले जाते. तुम्ही खऱ्या अर्थाने द्विज- रियलाईज व्हावे हीच तिची तळमळ आहे. ती सर्व काही करते. समजा झाडाच्या मुळाच्या टोकाला एक लहानसा मेंदू असला किंवा एखादी पेशी जिला समजतं तर त्याच्या आधारे मऊ जमिनीत मूळ धरेल. कडक पदार्थ वाटेत आला तर त्याला चिरडून टाकेल. झाड मूळ धरून वाढावे हीच त्याची धडपड राहील. त्याचप्रमाणे ही कुंडलिनी तुमच्या चक्रांवर काम करते. ती चक्र पूर्ण विकसीत होतील अशी त्यांची काळजी घेते. ही झाली शारीरिक कार्यप्रणाली. त्याचप्रमाणे मानसिक दृष्ट्या वेडे झालेले लोक पण बरे झाले. अगदी एड्समुळे ग्रासलेले लोकसुद्धा बरे झाले आहेत.

एकदा तुम्ही सहजयोगी झालात तर तुम्हाला कधीच कुठलाही त्रास होणार नाही. जर झालाच तर काहीतरी कमी पडत असणार. त्याचे कारण समजू शकेल व उपचार करून तुम्ही सुधारू शकाल. तुम्ही नेहमी निरोगी, उत्साही आणि मधुर स्वभावाचे व्हाल. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तुम्ही जीवनात आनंदी रहाल व आनंदी वाटाल.

डॉक्टर मंडळी काय सांगतात ते समजण्याकरता मी वैद्यकशास्त्राचा अभ्यास करत होते. त्यावेळीही ह्या सर्व व्याख्या ही भाषा नव्हती अस मला दिसून आले. खूप अज्ञान होते त्या लोकांशी मी कसे बोलणार? ते लोक माझे कसे ऐकणार?ते फक्त उथळ वृत्तीचे लोक होते. आता आमच्यात सर्व देशातील डॉक्टर्स आहेत. रशियामधून ३०० डॉक्टर्स आले, मी वैद्यकशास्त्राबद्दल बोलायला लागले तर ते म्हणाले,'हे सर्व खूप झाले, त्याबद्दल आम्हाला काही ऐकायचे नाही. आता आम्हाला परमेश्वराचे शास्त्र

सांगा' ते स्वत:चं आत्मपरीक्षण खूप करतात. त्यांना वाटतं की हे भौतिक ज्ञान व गोष्टी संपत आल्या आहेत आणि आपण आता नवीन विषयांकडे बघायला हवं.

ही कुंडलिनी तुमची स्वत:ची आहे. तुमचा ठेवा आहे. ती जागृत व्हायला मुळीच वेळ लागत नाही. या कलियुगातही खूप साधक आहेत. रशियामध्ये आमच्या प्रोग्रामला प्रत्येक वेळेस १६/१७ हजार लोक सहजयोगी झाले. त्यामुळे आपला व्यवसाय बंद पडेल असे डॉक्टर्स म्हणत असल्याचे मला कळले. पण अशा लोकांचे प्रमाण खूप कमी असल्याने डॉक्टरांना काळजी वाटण्याचे कारण नाही. भारताला सहजयोग हा एक महान आशीर्वाद आहे. आपल्या खेड्यापाड्यातही तो पोहचला आहे हे तुम्हाला माहीत आहेच. सहजयोग हा शेतीसारख्या इतर व्यवसायांनाही फायदेशीर/उपयोगी आहे. ही सर्व पूर्णपणे तुमच्यातील शक्ती आहे हे लक्षात घ्या. मानवरुपात तुम्ही आला आहात तर इतर फालतू गोष्टीत वेळ न दडवता तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात या आणि त्याचा आनंद घ्या.

प्रश्न : सहजयोगी डॉक्टर्स त्यांच्या व्यवसायात सहजयोग वापरतात का? डोळ्यांच्या विकाराकरीता त्यांनी सहजयोग वापरला आहे का? इथे पुष्कळ सहजयोगी चष्मा लावणारे दिसतात.

उत्तर : मी गेली पाच वर्षे चष्मा लावते. कारण प्रोग्राममध्ये प्रखर विद्युतझोतांना मला तोंड द्यावे लागते. 'शॉर्ट साईट' सहजयोगाने चांगली बरी करता येते. पण असे पहा की काही सहजयोगी स्वत:ची नीट काळजी घेत नाहीत. तस त्यांनी केलं तर ते पटकन बरे होतील. डॉ तलवार यांना दोन्ही डोळ्याचे पडदे निकामी होऊन चार वेळा ऑपरेशन करावे लागले. मोतोबिंदू काढला. शेवटी त्यांना सांगण्यात आले की आता कशाचाच उपयोग होणार नाही. त्यांना अंधत्व येणार. त्याला दहा वर्षे झाली. आता ते रात्री सुद्धा आरामात गाडी चालवतात. मोतिबिंदू काढल्यामुळे त्यांना चष्मा वापरावा लागतो. मोतीबिंदू ही मेलेली पेशी आहे. जिवंत कार्यामध्ये सहजयोग केल्यावर सुधारणा होऊ शकते.

आपल्याला आपले वाढते वय विसरून चालणार नाही. तुम्ही आयुष्यभर काही सोळा वर्षांचेच रहाणार नाही. या सगळ्या अमेरिकेतल्या कल्पना आहेत. आम्ही वयोमानानुसार परिपक्व होत आहोत याचा आम्हाला अभिमान आहे. दूषित हवामान, प्रदूषण यामुळे डोळ्याचे विकार होतात. माझ्या आजोबांनी कधीच चष्मा लावला नाही. वडिलांना फार उशिरा लागला. विशेषत: शहरांमध्ये प्रदूषण फार वाढत आहे. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या पुष्कळ गोष्टी आपल्याला पत्कराव्या लागतात. पण एखाद्या दुर्धर व्याधीपासून आपला बचाव होऊ शकतो. एरवी आपण निरोगी आणि चांगले आयुष्य मिळवू शकतो. आणि चष्मा लावणे हा काही रोग नाही.

प्रश्न :-सहजयोगात स्वत:ची चक्र सुधारण्याव्यतिरीक्त हटयोग, प्राणायाम, आसन, अशासारख्या काही पद्धती आहेत का?

उत्तर :- एखाद्याला हृदयविकाराचा त्रास आहे का हे बघितले पाहिजे. हृदय मरगळले किंवा अतिश्रमानी-विचारांनी तणावग्रस्त आहे हे पाहिले पाहिजे. पहिल्या प्रकारात अंजायनाचा त्रास होतो. तर दुसऱ्या प्रकारात हृदयक्रिया बंद पडण्याचे धोके असतात. पण हे सर्व चक्र तपासल्यावर कळून येते व त्यानुसार उपचार करता येतात. जास्त शारीरिक किंवा वैचारिक काम करणाऱ्यांनी आहारातून जास्त कार्बोहायड्रेटस घेतली पाहिजेत. डाव्या बाजूकडच्या लोकांनी 'प्रोटीन' असलेला आहार घ्यावा.

सहजयोगात हृदयविकार सहज बरे होतात. या राहूल बजाजला मोठा झटका आला होता पण मी फक्त ५-१० मिनीटे त्यावर काम केले आणि ते बरे झाले. तरी पण त्यांचा विश्वास बसला नाही. म्हणून पुन्हा डॉक्टरांकडे दाखविल्यावर त्यांनी पण तसेच सांगितले. तरी पण ते पुन्हा डॉ पुरी कडे तपासणी करुन घ्यायला गेले. तर ते त्याच्यावर रागावले आणि म्हणाले, 'तुम्हाला काही झालेले नाही उगीच माझा वेळ घेऊ नका.'

प्रश्न:- त्वचारोगाबद्दल काय?

उत्तर :- ते लिव्हरमुळे होतात काही प्रकारचे तेल वापरता कामा नये.

प्रश्न :-सहजयोग कसा करायचा ?

उत्तर:-आमच्या केंद्रावर सर्व माहिति मिळेल त्यासाठी

डॉक्टरांची जरुरी नाही.

प्रश्न:-रोगामुळे ग्रासलेले लोक खूप आहेत.अगदी तरुण लोकही बळी पडतात. किंवा लोकांना

डायलिसवर अवलंबून रहावे लागते.

उत्तर:-डायलिसिसचा उपचार चालू करण्याच्या आधी सहजयोगात आलात तर मदत होईल. आता तुम्ही उजव्या बाजूचे असलात तर डाव्या बाजूचे उपचार काय कामाचे? सहजयोग करतो म्हणून कुणाचा मृत्यू झाल्याचे अजून मी ऐकले नाही. अर्थात प्रत्येक जण बरा होईल अशी खात्री आम्ही देऊ शकत नाही.

पण एक गोष्ट लक्षात घ्या. आमचं काम रोग बरा करण हे नाही. लोकांना जागृती देणे 'रियलायझेशन' हे आमचे मुख्य काम आहे. आता एखादा रोगी आला तर आधी आम्ही त्याला जागृती देणार. त्याच्या त्रासावर काय करता येईल ते सांगणार. पण एकदा जागृती दिल्यावर ताबडतोब सर्व काही ठीक होईल अशी चुकीची समजूत करून घेऊ नका. जसे तुम्ही औषध घ्याल तसे तुम्ही सहजयोग्यासारखे नियमित ध्यान केले पाहिजे. आमच्या ध्यानाला फार वेळ घ्यायला नको. ५-१०मिनिटे नियमित केले तरी पुरे. पण हे सर्व पैसे खर्च न करता होते. अगदी सहज केव्हाही मिळण्यासारखे आहे.म्हणून लोकांना ते नको. ते मनापासून प्रामाणिकपणे सहजयोग घ्यायला तयार नसतात. तुम्ही डॉक्टर आहात म्हणून या गोष्टीकडे गंभीरपणे पहा.नाही तर तुम्हाला यश मिळणार नाही. यश न मिळण म्हणजे काय हे तुम्ही जाणता. मी एकदा बरे केलेले लोक पुन्हा त्याच रोगाने त्रासलेले पाहिले आहेत. आज एक दुखणं बरं करा तर उद्या दुसरं दुखणं सुरू असेही होते. डॉक्टरने मात्र औषधे दिली तर ते नियमीत घेतील.

मी एडसचे सहा रोगी बरे केले. ते पूर्ण बरे झाले होते. त्यातले दोघेजण परत पूर्वीसारखे वागायला लागले. आणखी दोघे म्हणाले आता आम्हाला जगायच नाही. दोनच फक्त टिकवून राहिले. त्यातला एकाला आता आठ वर्षे झाली. त्याचे वजन पण वाढले पण डॉक्टराने तपासल्यावर अजून काही मृत पेशी आहेत असे म्हणाले.

सहजयोग अगदी सोपा आहे. त्याला पैसे लागत नाहीत. जे लोक पुरेशा गंभीरपणाने त्याच्याकडे लक्ष देत नाहीत ते बाहेर पडतात. काही वेळा त्यांचा आजार बरा होत नाही आणि इतर काही बरे झाले तर त्यांना दुसराच कसला त्रास सुरू होतो. मी एकीला आठ वेळा बरं केलं तरीही ती ध्यान करायला तयार नाही.

आपण एक तर भविष्याचा विचार करतो नाहीतर भूतकाळाचा. पण मी नेहमी म्हणते की, तुम्ही वर्तमानात राहिलं पाहिजे. आपण जेव्हा मनांत विचार करतो तेव्हादोन विचारांच्या मध्ये एक अल्पसा काळ रहातो. त्याला विलंब म्हणतात.पण तो इतका क्षणभर असतो की, आपल्या तो लक्षात येत नाही. आपण नुसते विचारांच्या लाटेवर स्वार होऊन राहतो. कधी भविष्यकाळात तर कधी भूतकाळात. आपण वर्तमानांत कधीच असत नाही आणि वर्तमान हेच सत्य आहे. भूतकाळ किंवा भविष्यकाळ यांना तस अस्तित्व नसत. मग हे कसे साधायचे?कुंडलिनी जेव्हा वर चढते (उत्थान) तेव्हा विचार थंड होतात आणि विलंब वाढतो. त्यावेळी निर्विचाराच्या जाणीवेमध्ये तुम्ही येता. तुम्ही जाणत असता पण तुमच्या मनात विचार नसतो. यालाच ध्यान म्हणतात.

तुमची आत्मिक उन्नती होते. जाणिवेच्या एका वेगळ्या स्तरावर तुम्ही येता. वर्तमान हेच एकमेव सत्य आहे आणि त्यातच आध्यात्मिक प्रगती होऊ शकते. आता ही फुलं पहा.सामान्य माणूस त्याच्या किमतीपासून हर तऱ्हेचे विचार करेल. पण साक्षात्कारी माणूस साक्षी बनून त्याच्या सौंदर्याचाच आनंद घेत राहील. तो आनंद त्याच्या अंतरंगात भरून राहील आणि तो एक निराळ्याच सुंदर अवस्थेत राहील. यालाच खरं म्हणजे ध्यानात असणं म्हणायचं. लोक जर ध्यान करायला तयार नसतील तर आम्ही काहीच करू शकत नाही. पण एकदा ध्यानाची सवय लागली की ती सोडाविशी वाटणार नाही. रोज स्नान करण्यापेक्षाही त्यात जास्त समाधान आहे. त्याच्यामधून मिळणाऱ्या आनंदाला तुलना नाही. यालाच निर्विकल्प अवस्था म्हणतात. अशा अवस्थेत तुम्ही गेलात की कुडलिनी कार्यान्वित होते.आम्ही आजारी लोकांना बर करायला इथ आलेलो नाही. पॅरा-सिंपथेटिक सिस्टिम वर ताबा कसा मिळवायचा याचे पूर्ण ज्ञान जर तुम्हाला झाले तर तुम्ही खऱ्या अर्थाने रोग्यांना बरे करू शकाल.

●●●

# सार्थ कुञ्जिकास्तोत्र

संदर्भ :-सार्थ श्रीदुर्गासप्तशती,लेखक डॉ. ना.धो.देशपांडे

श्रीगणेशाय नम:। ओम अस्य श्रीकुंञ्जिकास्तोत्र मंत्रस्य सदाशिव ऋषि:। अनुष्टुप् छंद: ।श्रीगुणात्मिका देवता । ओम ऐं बीजम् । ओम ऱ्हीं शक्ति: ओम क्लीं कीलकम् । मम सर्वाभीष्टसिद्धयर्थे जपे विनियोग: ।।

ह्या कुंञ्जिकास्तोत्र मंत्राचा कर्ता सदाशिव ऋषी आहे. अनुष्टप् छंदात याची रचना आहे. श्रीत्रिगुणात्मिका देवता आहे. ओम ऐं हे बीज आहे. ओम ऱ्हीं ही शक्ती :आहे. ओम क्लीं हे कीलक आहे आणि माझी सर्व इष्टकार्ये सिद्धीस जाण्यासाठी ह्याचा विनियोग आहे.

शिव उवाच

शृणु देवि प्रवक्ष्यामि कुंञ्जिकास्तोत्रमुत्तमम् ।
येन मंत्रप्रभावेण चाण्डिजाप: शुभो भवेत् ।।१ ।।

शिव म्हणाले - हे देवी! मी तुला उत्तम प्रकारचे कुंजिकास्तोत्र सांगतो ते तू ऐक. ह्या स्तोत्रामंत्राच्या जपाच्या प्रभावामुळे देवीपाठ उत्तम तऱ्हेने पार पडतो. ।।१।।

न कवचं नार्गलास्तोत्रं कीलकं न रहस्यकम् ।
न सूक्तं नापि वा ध्यानं न न्यासो न वार्चनम् ।।२ ।।
कुंञ्जिकापाठमात्रेण दुर्गापाठफलं लभेत् ।
अतिगुह्यतरं देवि देवानामपि दुर्लभम् ।।३ ।।

कवचाचा पाठ करावयाचा नसेल, अर्गलास्तोत्र म्हणावयाचे नसेल, कीलकरहस्य म्हणावयाचे नसेल, सूक्तही म्हणावयाचे नसेल, न्यास करावयाचे नसतील, तरी केवळ कुंजिकास्तोत्राच्या पाठामुळे सप्तशतीच्या पाठाचे फळ प्राप्त होते. हे स्तोत्र अतिशय गोपनीय असून देवांनाही दुर्लभ आहे. ।।२-३ ।।

गोपनीयं प्रयत्नेन स्वयोनिरिव पार्वति ।
मारणं मोहनं वश्यं स्तम्भनोच्चाटनादिकम् ।।४ ।।
पाठमात्रेण संसिद्धयेत् कुंजिकास्तोत्रमुत्तमम् ।

मंत्र

ओम श्रूँ श्रूँ श्रूँ शं फट् ऐं ऱ्हीं क्लीं ज्वल उज्ज्वल प्रज्वल
ऱ्हीं ऱ्हीं क्लीं स्रावय स्रावय शापं नाशय नाशय
श्रीं श्रीं श्रीं जूं स: स्रावय आदय स्वाहा ।।५ ।।
ओम श्लीं हूँ क्लीं ग्लां जूं स: ज्वल उज्ज्वल
मन्त्रं प्रज्वलं हं सं लं क्षं फट् स्वाहा ।।६ ।।
नमस्ते रुद्ररुपायै नमस्ते मधुमर्दिनि ।
नमस्ते कैटभनाशिन्यै नमस्ते महिषार्दिनी ।
नमस्ते शुभहन्त्यै च निशुंभासुरसूदिनि ।।७ ।।

रुद्ररूप असणाऱ्या देवी! तुला नमस्कार असो, मधुदैत्याचे मर्दन करणाऱ्या देवी ! तुला नमस्कार असो. कैटभाचा नाश करणाऱ्या हे देवी! तुला नमस्कार असो. महिषासुराला मारणाऱ्या देवी! तुला माझा नमस्कार असो. शंभु व निशुंभाला मारणाऱ्या देवी ! तुला नमस्कार असो . ।।७ ।।

नमस्ते जाग्रते देवि जपे सिद्धिं कुरुष्व मे ।
ऐंकारी सृष्टिरूपिण्यै ऱ्हींकारी प्रतिपालिका ।।८ ।।

हे देवी ! माझ्या जपाची जागृती कर व जप सिद्धही कर 'ऐं' स्वरूपी देवी की जी सृष्टिरूपात असणारी व उत्पन्न करणारी आहे, 'ऱ्हीं' कारस्वरूपी देवी की जी पालनपोषण करणारी आहे, तिला माझा नमस्कार असो. ।।८ ।।

क्लीं काली कालरूपिण्यै बीजरूपे नमोस्तुते ।
चामुण्डा चण्डरुपा च यैंकारी वरदायिनी ।।९ ।।

'क्लीं' कारी (कामरुपिणी)देवीला, कालस्वरुपी व संहार करणाऱ्या बीजरूप देवीला नमस्कार असो. हे चामुण्डे, उग्रस्वरूप धारण करणाऱ्या देवी व 'यैं' कारी देवी तू वर देणारी आहेस. तुला नमस्कार असो. ।।९ ।।

विच्चे त्वभयदा नित्यं नमस्ते मन्त्ररूपिणि ।।१० ।।

'विच्चे' स्वरूपे देवी, तू अभय देणारी आहेस. 'ऐ ऱ्हीं क्लीं चामुंडाये विच्चे हा मंत्ररूप असणाऱ्या देवी! तुला माझी सदा प्रणती असो. ॥१०॥

धां धीं धूं धूर्जटेः पत्नी वां वीं वागीश्वरी तथा ॥

क्रां क्रीं क्रूं कुज्जिका देवी श्रां श्रीं श्रूं मे शुभं कुरु ॥११॥

धां धी धूं स्वरुपी भगवान शंकराची पत्नी आणि वां वीं स्वरुपी तू वागीश्वरी (सरस्वती)आहेस. क्रां क्रीं क्रू स्वरुपी हे देवी! तू कुंज्जिका (किल्ली)आहेस. श्रां श्री श्रूं स्वरूपी हे देवी ! तू माझे कल्याण कर. ॥११॥

हूं हूं हूंकाररूपिण्यै ज्रां ज्रीं ज्रूं भालनादिनी ।

भ्रां भ्री भ्रूं भैरवी भद्रे भवान्यै ते नमो नमः ॥१२॥

हे देवी ! तू हूं हूं रूपात हूंकारस्वरूप आहेस. ज्रां ज्रीं ज्रूं रूपी भयंकर नाद करणारी आहेस. भ्रां भ्रीं भ्रूं रूपी तू भैरवी आहेस. हे कल्याणी! भवानीस्वरूप असणाऱ्या देवी! तुला माझा नमस्कार असो ॥१२॥

ओम अं कं चं टं तं पं सां विदुरां विदुरां

विमर्दय विमर्दय ऱ्हीं क्षां क्षीं स्रीं जीवय जीवय

त्रोटय त्रोटय जंभय जंभय दीपय दीपय मोचय मोचय

हूं फट् ज्रां वौषट् ऐं ऱ्हीं क्लीं रंजय रंजय संजय संजय

गुंजय गुंजय बंधय बंधय भ्रां भ्रीं भ्रूं भैरवी भद्रे

सकुंच सकुंच त्रोटय त्रोटय म्लीं स्वाहा ॥१३॥

पां पीं पूं पार्वती पूर्णा खीं खीं खूं खेचरी तथा ॥

म्लां म्लीं म्लूं मूलविस्तीर्ण कुंजिकास्तोत्रहेतवे

अभक्ताय न दातव्यं गोपितं रक्ष पार्वति ॥१४॥

पां पीं पूं स्वरूपात पूर्ण व पार्वती आहेस. त्याचप्रमाणे खां खी खूं स्वरूपी तू खेचरी आहेस. कुंजिकास्तोत्र (सिद्ध होण्यास)कारण होणारी म्लां म्ली म्लू स्वरुपी (मंत्रात)तू मुळातच व्यापक स्वरूपात राहतेस. हे पार्वती! अभक्तांना (तू)हे स्तोत्र देऊ नये तर गुप्त ठेवून ह्याचे रक्षण करावेस. ॥१३-१४॥

विहीना कुंज्जिकादेव्या यस्तु सप्तशतीं पठेत् ।

न तस्य जायते सिद्धिर्ह्यरण्ये रुदितं यथा ॥१५॥

हे कुंज्जिकास्तोत्र न म्हणता जो मनुष्य सप्तशतीचे पठण करतो त्याचा तो पाठ अरण्यरुदनच ठरतो. म्हणजेच निष्फळ ठरतो. ॥१५॥

इति श्रीडामरतंत्रे ईश्वरपार्वतीसंवादे 'कुंज्जिकास्तोत्र' संपूर्णम् । ह्याप्रमाणे डामरतंत्रातील ईश्वरपार्वती संवादरूपी 'कुंज्जिकास्तोत्र' पूर्ण झाले.

• • •

- आपण सर्वांनी सामूहिक बनले पाहिजे. कशाबद्दलही कुरबूर करता कामा नये, अढी बाळगता कामा नये. सामूहिकतेचा आनंद उपभोगला पाहिजे. सामूहिकतेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करु नका. सामूहिकतेतील तुमचे अस्तित्व असे हवे की दुसऱ्या व्यक्तीला तुमच्या सानिध्याचा आनंद मिळवा. – बुद्ध पूजा ९८
- सहजयोग साधुसंतांचा असला तरी सन्याशांचा नाही. समाजात राहून समाजाची प्रगती करुन, लोकांच्या विचारांची प्रगती करुन समाजाला मदत करणारा असा सहजयोग आहे. –शेरे भाषण ९६
- तुम्ही दुसऱ्याला चैतन्य दिले नाही, दुसऱ्यामध्ये परिवर्तन घडवून आणले नाहीत, दुसऱ्याला मदत केली नाही तर ध्यानाचा, पूजेला येण्याचा काय फायदा ? नुसते बरे वाटते, आनंद होतो एवढाच? असे सहजयोगी बेकार आहेत. – नवरात्री पूजा ९६
- तुमचे आपापसातील संबंध, देवाण-घेवाण, भाषा, भजने इ. मधून सर्वांनी एकमेकांच्या संपर्कात या आणि शांति, सत्य, प्रेम, करुणा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहजयोग सगळीकडे पसरवा. –श्रीकृष्ण पूजा ९४

# श्रीमाताजींचे पूजाप्रसंगीचे प्रवचन

## कळवा, ३१ डिसेंबर ९८ (संक्षिप्त)

आज मी भारतीय संस्कृतीबद्दल बोलावे आशी इच्छा प्रदर्शित केली गेली. पण आज या मुंबईमध्येच ही संस्कृती दिसेनाशी झाली आहे. असे म्हटले जाते; पण मला ते मान्य नाही. कारण या संस्कृतीची पाळेमुळे इतक्या खोलवर पोचली आहेत की ती अशी नाहीशी होणार नाही. बाहेरून या देशात आलेल्या लोकांनाही आता हे समजले आहे की या देशाला लौकिक अर्थाने असा कोणता धर्म नाही; इथे इतर देशांसारखी धर्मासाठी अशी संस्थाप्रणाली नाही. पाद्री वगैरे सारखे धर्मगुरु नियुक्त केले जात नाही. तरीही इथे धार्मिकता आपोआप व सहजपणे रुजली आहे. पण त्यांच्या पाठीमागे मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे इथे पूर्वीपासून अनेक थोर साधु-पुरुष होऊन गेले आणि त्यांना संत ही पदवी मिळाली. म्हणून त्यांना कुणी चॅलेन्ज केले नाही आणि सर्व समाजाने त्यांचे सांगणे मान्य केले. कालान्तराने इथे जातिव्यवस्था आली. पूर्वी असा जातिभेद नव्हता.

.संतांनी सर्व जातीच्या लोकांना भेदभाव न करता भक्तीमार्गामध्ये एकत्र आणले आणि सगळ्या जातीच्या लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवण्यातच जीवनाचे सार्थक आहे ही शिकवण दिली. संता-संतामध्ये जातीनुसार काहीच फरक केला गेला नाही. त्यांना कुठल्या एका धर्माचे-हिंदू, मुस्लिम, जैन इत्यादी म्हणून त्यांच्यात फरक केला गेला नाही आणि सर्वांना संत म्हणून मानले गेले. त्या सर्वांनी नितिधर्मानुसार व उच्च स्तराच्या आध्यात्मिक पातळीवरील जीवनाची शिकवण दिली.सहजयोगी म्हणून तुमच्यातही आता पूर्वीचा धर्म, जात इ. बद्दलचा विसर पडला आहे. ते भेदभाव गळून गेले आहेत आणि योगी बनल्यावर नीतीमत्ता हाच तुमच्या जीवनाचा आधार-स्तंभ झाला आहे.

आपल्या संस्कृतीचा अध्यात्म व नीती हाच मुख्य धागा आहे. त्याशिवाय मानवप्राणी जनावरांपेक्षाही वाईट होतो. नितीमत्तेची प्रत्येकाला फार जरुरी आहे. आमच्या तरुणपणीसुद्धा नितीमत्ता फार जपली जायची. पण आजकाल सगळाच विचित्र प्रकार झाला आहे. तो एक प्रॉब्लेमच बनला आहे आणि जोपर्यंत सहजयोगाचा जोमाने प्रसार होत नाही तोपर्यंत या देशातील परिस्थिती सुधारेल असे मला वाटत नाही. त्यातील मुख्य तत्त्व हेच आहे की एकदा नीतिमत्तेकडे तुमचे चित्त लागले की प्रत्येक गोष्टीमधील मूलभूत तत्त्वे तुमच्या लक्षात येतात; तुम्ही अगदी वेगळ्या प्रकाराद्वारे कार्य करु लागता. नुसत्या भौतिक फायद्याचाच विचार केला तर तुम्ही अमेरिकन माणसासारखे व्हाल; तसेच कुठल्याही हलक्या गोष्टीकडे वळलात तर तेच होणार. भारतीय संस्कृतीचा मूळ आधार नीतिमत्ता व अध्यात्म हाच आहे; इथे अनीतिमान व्यक्ती अगदी हीन जातीची समजली जाते; त्याला विवाहासाठी अयोग्य समजतात व समाजात त्याला काही किंमत नसते. एवढेच काय कुटुंबामध्येही त्याचा स्वीकार होत नाही. अशी माणसे समाजस्वास्थाला घातक असल्यामुळे त्यांना समाजापासून दूर ठेवले जाते..

शुद्ध आचरणाला म्हणूनच फार महत्त्व आहे. इथे कुणा एका सधन माणसाचे लग्न ठरले होते. पण नंतर त्या मुलाचे कुणा मुलीबरोबर संबंध असल्याचे कळल्यामुळे मुलीच्या भावाने त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला, आता त्या मुलाचे लग्न होणे या गावामध्ये अशक्य आहे. म्हणजे शुद्ध आचरणाबद्दल समाजच जागरुक असतो. विशेषत: सहजयोगात आल्यावर तुम्ही धर्माविरुद्ध आचरण करू शकत नाही; तसे करायचा प्रयत्न केलात तर सहजयोगातून बाहेर फेकले जाल.जी अगदी साधी व स्वच्छ गोष्ट आहे. एकवेळ मी क्षमा करेन पण सहजयोग क्षमा करणार नाही. कारण मग इतर सहजयोग्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होईल.म्हणून शुद्धतेला सहजयोगात फार फार महत्त्व आहे. पण मला आश्चर्य वाटते म्हणजे हे पाश्चात्य लोक सहजयोगात आल्यावर सहज-धर्माचे परिपूर्ण आचरण करतात. त्याबाबतीत काटेकोरपणे वागतात. कारण यातच त्यांचे कल्याण आहे हे त्यांनी ठामपणे जाणले आहे; त्यातूनच आपली वाढ होणार आहे म्हणून नीतीमत्ता हे आपल्या जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. याची त्यांना खात्री पटली आहे. अनीतीच्या गोष्टी त्यांचे वडील, कुटुंबीय व मित्र वगैरे करत असलेले ते पाहतात पण त्यांच्याकडे ते ढुंकुनही पहात नाहीत. ही फार अभिमानाची गोष्ट आहे. आपल्या लोकांची गोष्ट वेगळी आहे कारण आपली संस्कृती व वातावरण शुद्ध आचरणाचा आदर करणारे आहे. स्त्रीकडे नुसते बघणेही आपल्याकडे चुकीचे समजले जायचे.

काही स्वत:ला आधुनिक व पुढारलेल्या म्हणून घेणाऱ्या संस्थाही भारतात सुरु झाल्या आहेत. आपण साधारण व सुशील कुटुंब बनून राहणे हेच योग्य. पण पाश्चिमात्य लोकांना तेथील विशिष्ठ जीवनपद्धतीमुळे ही गोष्ट मानायला अवघड आहे. पण एकदा ते

सहजयोगात आले की हे सर्व आपोआप सुटून ते इतके सुंदर सहजयोगी बनतात की मलाच आश्चर्य वाटते. त्यांच्याकडे प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे काहीही करण्याचे स्वातंत्र्य असते. भारतामध्ये मुलांना तशी मुभा नसते. वाटेल तिथे वाटेल तेव्हा जाण्याची परवानगी नसते. त्या स्वातंत्र्यामुळेच तिकडचे अनेक लोक वाया गेले पण जे वाचले ते मोठे झाले, या स्वतंत्रतेमधूनच भारतीय संगीतही हे सहजयोगी तीन-चार महिन्यात शिकले. भारतीय लोकांना ते जमत नाही कारण त्यांच्यावर बरीच नियंत्रणे असतात. बंधने असतात आणि धर्माच्या बंधनाखाली त्यांना रहावे लागते.

मुख्य म्हणजे तुम्हाला जे स्वातंत्र्य सहजयोगात मिळाले आहे त्यामधून तुम्हाला वेगळे असे विशेष व्यक्तिमत्व मिळाले आहे. ते स्वातंत्र्य कसे ठेवायचे हा तुमचा व्यक्तिगत प्रश्न आहे. पण मुलांच्या बाबतीत त्यांना अवाजवी शिस्तीत व बंधनात ठेवणे मला वाटते चांगले नाही. रविशंकर सतार शिकत असताना एक स्वर चुकीचा लावला म्हणून त्यांच्या गुरुंनी तंबोराच त्यांच्या डोक्यात मारून फोडला. तसे काही नसल्यामुळे या पाश्चात्य मंडळींना भारतीय संगीत तीन-चार महिन्यात शिकता आले. मग भारतीय लोकांना ते का जमू नये? त्या लोकांची आकलनशक्तीच तीव्र आहे. म्हणून सहजयोग्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. तेच स्वातंत्र्य मुलांनाही मिळाले पाहिजे. त्यामुळे ती बिघडतील व चुका करतील अशी धास्ती बाळगायची जरुरी नाही उलट त्यांची आकलनशक्ती खूप बळकट होईल. म्हणूनच पाश्चात्य लोक स्वातंत्र्य वापरून सत्याकडे आले की ते तेजस्वी बनतात.

म्हणून माझी भारतीय लोकांना विनंती आहे की मुलांवर कसलेही अती दडपण आणू नका. आपण मुलांबरोबर खूप आनंद मिळवतो पण अवाजवी बंधनेही त्यांच्यावर लावतो. इथे का बसलात,हे का घेतलेस इ. सारखे टोचू नका. त्यामुळे मुलांनाही तेच अंगवळणी पडते. अशा अवाजवी काटेकोरपणामुळेच मुलांचे व्यक्तिमत्व खुंटते हे माझ्या लक्षात आले. पाश्चात्य लोक खराबच आहेत असे सारखे म्हणण्यात काय अर्थ नाही आणि एकदा ते सहजयोगाकडे वळाले की ते मास्टर बनतात. स्वातंत्र्य द्यायचे का नाही हाच मुळात प्रश्न आहे. आत्मसाक्षात्कारानंतर आपल्यामध्ये विवेक जागृत झालेला असतो. आणि मुले तर जन्मत:च आत्मसाक्षात्कारी असतात. त्यांना हळूहळू सर्व सहजयोग समजेल आणि तो आत्मसात करून त्याचा आविष्कार ते प्रकट करू शकतील.

आज मी हे आत्म्याच्या स्वतंत्रतेबद्दल सर्व तुम्हाला सांगितले. म्हणून आपण मुलांना आणि त्यांच्यामधील आध्यात्मिकतेला समजून घेतले पाहिजे. त्यांच्यामधील धर्मपण जागृत झालेला आहे. आपण त्यांच्या सारखे मागे लागत जाऊन त्यांच्यावर बंधने घालू नये; उलट त्यांना काय करायचे ते करू दे. ते कुठल्याही गोष्टीबद्दल मर्यादेबाहेर जाणार नाहीत. तसेच त्यांच्या भविष्याची आत्तापासून काळजी करू नका. मी तर काही सात-आठ वर्षांची मुलेही बुद्धिमान असल्याचे बघितले आहे.

आपण मुलांबाबत अती काटेकोरपणा व शिस्त बाळगू नये. हा आपल्या सहजसंस्कृतीचाच भाग आहे. भारतीय संस्कृतीमध्ये असे बसत नाही असे कदाचित तुम्हाला वाटेल पण मुलांबद्दलची आपली धारण सहज-संस्कृतीमध्ये बसेल हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे त्यांना जन्मत:च साक्षात्कार मिळाला आहे याची किंमत आपल्याला समजेल. मी तर मुलांमध्ये फार रमते; त्यांचे बोलणे किती मधुर असते, एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा गोष्टीबद्दल ती किती गोड बोलतात. त्यांना बोलण्याची प्रेरणा व मुभा दिली की ती अगदी मजेदारपणे सांगतात.

तुम्ही पाश्चात्य मंडळींनी व बऱ्याच उत्तर-भारतीय लोकांनी सहजयोग चांगला मुरवला आहे. आणि त्यांनी भारतीय संगीत व कलेमध्ये मिळवलेले प्रावीण्य मलाच आश्चर्यकारक वाटते. म्हणजे तुम्ही चांगले स्वातंत्र्य मिळवले आहे. आता त्याचा आविष्कार करण्याकडे लक्ष द्या व तुम्हाला जे सहजयोगातून मिळाले आहे ते प्रकट होऊ द्या. तसे केले नाही तर त्याचा फायदा तुम्हाला मिळणार नाही. संख्येने तुम्ही आपापल्या देशात नगण्य असाल पण तुमची पातळी फार वरच्या दर्जाची आहे. म्हणून तुम्ही तन-मन-धनाने सहजयोगाच्या कार्याला व प्रसाराला वाहून घेतले पाहिजे.

भारतातील चांगल्या शाळेत शिकणारी मुले अगदी शांत व शिस्तीत असतात, मोठ्या माणसांसमोर बोलायचे नाही, दुसऱ्या घरी गेल्यावर त्यांच्याकडे काही मागायचे नाही, कुणी दिले तर घेऊ का नको म्हणून आईवडिलांकडे बघतील आणि त्यांनी हो म्हटल्यावरच घ्यायचे अशा शिस्तीत असतात. मुलांशी बोलायला, गप्पा मारायला कुणालाही आवडते. पण मला वाटते की आपण मुलांची जरा जास्तच काळजी घेतो; हे कर, ते कर, हे केलेस का असे सारखे त्यांच्या मागे लागतो.या मुलांचे पाहिले तर त्यांच्या शाळाही जंगलात नाही तर डोंगरावर, कुठेतरी पडतील, धडपडतील याचीही भीती, पण ती मुले मनात आणले तर चित्र काय काढतील, घर बनवतील, पेंन्टींग करतील! आपल्याकडे असे बघायला मिळणार नाही; मला वाटते की आपल्या मुलांमधील कर्तुत्व आपण मारून

टाकत असतो. तसं व्हायला नको. त्याचबरोबर धार्मिकता आली पाहिजे. पावित्र्य आले पाहिजे. शिवाय हे लोक आपल्याकडे संगीत शिकायला आले तर फक्त चार महिन्यात मालकंस रागसुद्धा वाजवायला शिकले, जो राग आपल्याकडे दहा-दहा वर्षे घासून शिकावा लागतो, शिवाय चूक झाली तर गुरुकडून मार खावा लागतो, मग कुठे दहा -बारा वर्षाची खडतर साधना करून संगीतकार बनतात.

आपल्याकडे रविशंकरसुद्धा असेच कष्ट करुन शिकले. मग या लोकांना तीनचार महिन्यात कसे जमते? त्यांना तर मुळात आपल्या संगीताबद्दल, संस्कृतीबद्दल काहीच माहीत नाही. म्हणून मला वाटते की आपण आपल्या मुलांचे कलागुण दाबून ठेवल्यामुळेच असे होते. मुलांना सारखं- सारखं रागवू नये. मी तर मुलांना कधीच रागवत नाही उलट काही झाल्यानंतर ती अशी का वागली? याचा विचार करते. तसेच उठल्यासुटल्या मुलांना दूषणे देणे योग्य नाही. म्हणून मग आपली मुले वाचन करतील, अभ्यास करतील पण त्यांच्यातील कल्पकता विकसित होत नाही. इथे कलेबद्दलचा आदरभाव कमीच आहे पण दुसरे विशेष म्हणजे सात्विकताही कमी दिसते. मुले स्वतंत्र बुद्धीतून चांगली झाली पाहिजेत. जबरदस्तीचा राम राम उपयोगीचा नाही.

सहजयोगी म्हणून तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की तुमची मुले जन्मत:च आत्मसाक्षात्कारी आहेत तेव्हा त्यांचा मान ठेवलाच पाहिजे. ते साधु-संतच म्हणून तुमच्या घरी आले आहेत हे लक्षात घ्या. त्यांचे बोलणे ऐकलेत की तुम्हाला आश्चर्यच वाटेल; त्यांना कमालीचे डोके व कमालीची समज असते. इतकी की आपल्यालाही ते जमणार नाही. एकदा माझ्या नातीने माझी साडी मोलकरणीने जमिनीवर टाकली हे पाहिले आणि ती तिला चावली आणि म्हणाली की ही कुणाची साडी आहे हे माहीत आहे का तुला? असे त्यांचे जे वागणे आहे, जे ब्रीद आहे त्याचे कौतुक केले पाहिजे. मुलं काय सांगतात हे नीट बघावे व लक्षात घ्यावे, त्यात कसला कमीपणा मानण्याची गरज नाही. आपल्याकडे मुलांवर जी शिस्त लावली जाते ती कमी करावी. त्यातून तुमची ही मुले पार झालेली आहेत, आता तर पुष्कळ लोक पार होणार आहेत. म्हणून त्याचे वागणे बघावे, त्यांचे विचार बघावे, त्यांच्याशी गप्पा माराव्या; या मुलांशी नुसते बोलतानाही वेगळाच आनंद होतो इतक्या मजेदार गोष्टी बोलतात. माझ्या डोक्यात आले की ही परदेशातील मुले शाळेत जातात तिथे मास्तरांना छडी ठेवण्याची परवानगी नसते. तिथे तुम्ही काही म्हटले तरी कायद्यानुसार केस करुन शिक्षा देण्याइतपत गोष्टी चालतात.

त्यांच्याकडे स्वातंत्र्याच्या विचारातून अशा कल्पना आल्या आहेत. म्हणून जी जन्मत:च सिद्ध आहेत अशा मुलांचा मान नको का ठेवायला? तुम्ही सहजयोगी नंतर झालात पण ही मुले जन्मत:च सहजयोगी आहेत म्हणून त्यांचा मान ठेवलाच पाहिजे. तसा मान ठेवताना त्यांची थट्टा-मस्करी पण करायची नाही. म्हणजे ते आजच्या सहजयोग्यांच्या बरोबरीत उभे रहातील याची मला खात्री आहे. तसेच त्यांना सहजयोगाचे पूर्ण शिक्षणही दिले पाहिजे. हे जर आपल्यामध्ये घडून आले तर आपली मुले कशातही कमी पडणार नाहीत आणि त्यातूनच आपल्या देशाची सर्वप्रकारे उन्नती होईल.

आपण ज्याला अध्यात्म म्हणतो ते आपल्या देशात भरपूर आहे. अध्यात्म म्हणजे पुष्कळ लोकांना वाटते की हरी-हरी करत बसणे, काही काम न करणे इ. पण तसे काही नसते. शक्तीच्या संचार झाल्यावर तुमच्यावर परिणाम होणारच. त्यात शंका नाही. पण तुमच्या मुलांची मला काळजी वाटते; मी या देशाचे जे भविष्य पाहत आहे त्याप्रमाणे ते फार भावी कर्तबगार लोक तुमच्या पोटी जन्माला आले आहेत. तुम्ही पार झालेले आहात म्हणूनच त्यांनी तुमच्या पोटी जन्म घेतला आहे. हे जर तुम्ही समजून घेतले नाही तर ही साधु-संतांसारखी मुले वाया जातील. म्हणून मुलांना मारणे, त्यांना शिक्षा करणे, त्यांच्यावर ओरडणे रागवणे हे प्रकार सहजयोग्यांनी अगदी बंद केले पाहिजेत. आजपर्यंत मी असे बोलले नाही पण मी आज विचार केला की लोकांना आता हे समजावून सांगायलाच हवे. तुमच्या मुलांमध्ये ज्या शक्त्या आहेत त्या आणखी जागृत केल्या पाहिजेत.

मुलांना रागावलेले मला मुळीच पसंत नाही. त्यांचे काही चुकले तर त्यांना समजावून सांगितले पाहिजे. त्यांच्यावर जबरदस्ती करु नये. साधु-संत म्हणून ते तुमच्या पोटी आलेले असल्यामुळे त्यांना सांभाळून घेतले पाहिजे. त्यांच्याशी प्रेमाने वागा. ते जन्मत: साक्षात्कारी असल्यामुळे ते चुकीच्या गोष्टी करणार नाहीत. तुमचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. कारण हीच मुले पुढे मोठे होऊन या देशाचे नागरिक बनणार आहेत. हीच मुले पुढे मोठे कार्य करणार आहेत. आपल्या देशात जे महान थोर लोक होऊन गेले त्यांच्यासंबंधी लोकांना एकंदरीत कमीच माहिती असते. त्यांनी खूप त्याग करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांच्याबद्दलची माहिती मुलांना समजावून सांगा. या गोष्टी तुम्हालाच करायच्या आहेत.

● ● ●

## ९ ऑगस्ट २००७, कबेला प्रस्थान








# श्रीकृष्ण पूजा, कबेला २००७



